बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १२ | बुधवार,दि.०१ मार्च २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024



## गोंदिया शहरात डासांचा प्रकोप, पालिका प्रशासन कुंभकर्णी निद्रावस्थेत



**गोंदिया:** कोरोनाचा संकटकाळ जरी गेला असला तरी त्या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न शासनस्तरावर आजही केले जात आहेत. त्यासाठी ग्रामीण असो की, शहरी भागात स्वच्छता अभियान राबविले जात असून डासांच्या वाढत्या प्रकोपामुळे जनतेचे आरोग्य सुरक्षित राहून डेंगू मलेरियाची लागण होऊ नये याची काळजी घेण्याची जबाबदारी ही स्थानिक पालिका प्रशासनाची असते. मात्र गोंदिया शहराला महानगरपालिका बनवू बघणारे अधिकारी नगरपालिकेच्या विद्यमान कार्यक्षेत्रातच आजच्या घडीला नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यात अपयशी पडल्याने शहरातील प्रत्येक वार्डातील नाल्यामध्ये व रिकाम्या भुखंडावर जागोजागी सांडपाणी साचल्याने डासांची मोठ्याप्रमाणात उत्पती झाली आहे.

या डासांमुळे सर्वसामान्य जनतेचे जिणे बेजार झाले असून रात्रीलाच नव्हे तर सध्याच्या परिस्थितीत दिवसालाही घरामध्ये डासांच्या प्रकोपाने आरोग्याची समस्या निर्माण होऊ लागली आहे. गेल्या वर्षभरापासून गोंदिया नगरपालिकेवर एकछत्री राज प्रशासकाचे आहे. मात्र प्रशासक असलेल्या मुख्याधिकारी यांना शहरातील स्वच्छतेशी काहीच देणघेण नसल्याचे दिसून येत असल्यानेच डासांची समस्या उदभवलेली असतानाही शहरात अद्यापही फवारणी करण्याचा निर्णय घेतलेला दिसून येत नसल्याने भविष्यात शहरात मोठ्या प्रमाणात या डासांमुळे डेंगू मलेरिया सारखे आज फोफावल्यास नवल वाटायला नको अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

शहरात डासांचा प्रकोप सातत्याने वाढत आहे. अधेमधे साचणाऱ्या डबक्यांमुळे डासांची संख्या वाढत असून शहरातील प्रत्येक भागात ही समस्या मोठ्या प्रमाणात उद्भवत असल्याचे स्पष्ट होत आहे. आधीच मलेरिया, डेंग्यू सारख्या आजारांची समस्या भोगून आहेत. त्यात व्हायरल तापाच्या संक्रमणाचे संकट निर्माण झाले असून ताप आणि कोरडा खोकल्यासह घशात दुखण्याची लक्षणे वाढत आहेत. डेंग्यूमध्येही तीव्र ताप असतो. डेंग्यूवर आतापर्यंत कोणतीच व्हॅक्सिन निघालेली नाही. अशा चहुबाजूंनी निर्माण होणाऱ्या संकटामुळे डासांवर नियंत्रण मिळविण्याची मागणी होत असतानाही नगरपालिका व जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना केल्या जात नसल्याचे दिसून येते.





फॉगिंग मशीन कुठे गेल्या त्या कुणासही ठाऊक नाही की बंद पडल्या हे सुध्दा सांगायला कुणीच तयार नाही. शहराच्या मध्यभागात असलेल्या प्रमुख भाजीबाजारात तर व्यवसायिकांनी फेकलेल्या घाण कचऱ्यामुळे अस्वच्छतेने कळस गाठला आहे अशा मार्केटमध्ये नागरिकांची खरेदीकरीता वहीवाटही आहे. येथे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. काका चौक, मामा चौक, शिवनगर, सिव्हील लाईन, गणेशनगर, मरारटोली, रेलटोली, अंगुरबगीचा रोड, राजाभोज कॉलनी या भागात मोठ्या संख्येने इस्पितळे आहेत. या भागात डासांचा प्रकोप वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.पांडे लेआऊट,टिचर कॉलनी, सिंधी कॉलनी, शास्त्री वार्ड, छोटा गोंदिया, कन्हारटोली या भागातही डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.शहरात अविकसित ले-आऊट्सची भरमार आहे. मोकळे भूखंड,झुडपे आदी भागात साचलेले पाणी, सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांची न होणारी सफाई यामुळे या भागात दिवसा व संध्याकाळच्या वेळी डासांचा प्रकोप वाढल्याचे दिसून येतो. त्यामुळे नागरिकांचे घरात राहणे कठीण असते तर गणेशनगर भागात कचरा डम्पिंग यार्ड आहे.

डम्पिंग यार्डमुळे तसेही या भागातील नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. त्यातच डासांचे संकट कोसळले आहे. डासांच्या प्रकोपामुळे नागरिकांना घरात आणि घराबाहेर उभे राहणे तारेवरची कसरत झाली आहे.गेल्या दीड दोन वर्षापासून शहरातील नाल्या व घाणीच्या ठिकाणी फॉगींग मशीनच्या माध्यमातून कधी फवारणी झाली असेल असा सांगणारा कुणीही नागरिक जो कर पालिकेला देतो तो सांगू शकणार नाही अशी परिस्थिती झाली आहे.

डासांच्या समस्येवर योग्य उपाययोजना करण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे. शहराच्या सीमावर्ती भागापासून ते मध्यवती व पॉश भागातही डासांचा प्रकोप वाढला आहे. योग्य वेळी योग्य पाऊल उचलणे गरजेचे झाले आहे. अन्यथा गंभीर आजारांचा प्रकोप वाढण्यास वेळ लागणार नाही.

## आपसी समन्वयाशिवाय गावाचा विकास अशक्य-जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले

✻ जिल्हास्तरीय सरपंच परिषद, प्रशिक्षण व संकल्प मेळावा थाटात

✻ उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींचा झाला गौरव



**गोंदिया–** गावाचा विकास करण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती हवी असते. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सरपंचांना पुढाकार घेऊन स्वतः झिजावे लागते. तेव्हाच कुठे गा-वात विकासाला चालना मिळते. मात्र हे करताना अधिकारी व पदाधिकारी आपसी समन्वय होणे आवश्यक आहे.समन्वयाशिवाय गावाचा विकास अशक्य असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले.

जल जीवन मिशन जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग व पंचायत विभाग जिल्हा परिषद गोंदिया यांच्या समन्वयाने दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हास्तरीय सरपंच परिषद, प्रशिक्षण व संकल्प मेळाव्याचे आयोजन न्यू ग्रीनलँड लॉन, येथे करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षीय स्थानावरून मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी उद्घाटक जिल्हाधिकारी म्हणून चिन्मय गोतमारे, मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती शीतल पुंड, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समिती सभापती योपेंद्रसिंह टेंभरे, जि. प. महिला व बालकल्याण सभापती सविता ताई पुराम, सडक अर्जुनी पंचायत समिती सभापती संगीता खोब्रागडे, गोंदिया पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, गोरेगाव पंचायत समिती सभापती मनोज बोपचे, अर्जुनी मोरगाव पंचायत समिती सभापती कविता ताई कोडापे, सालेकसा पंचायत समिती सभापती प्रमिला गणवीर, आमगाव पंचायत समिती सभापती राजेंद्र गौतम, देवरी पंचायत समिती सभापती अंबिका बंजार, जि. प. गटनेता लायकराम भेंडारकर, गटनेता आनंदा वाडीवा, जिल्हा परिषद सदस्य डॉ. लक्ष्मण भगत, जिल्हा परिषद सदस्या तूमश्वरी बघेले, जिल्हा परिषद सदस्य उषा मेंढे, जि.प.सदस्या छबूताई उईके, जि.प.सदस्य शैलेश नंदेश्वर, जि प. सदस्य पवण पटले, जि.प. सदस्य राधिका धरमगुळे, जिल्हा परिषद सदस्य डॉ.भुमेश्वर पटले, जि. प. सदस्य प्रिती ताई कतलाम आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून लोक सहभागातून ग्रामविकास याबाबत चंद्रपूरचे चंदू पाटील मारकवार, मी लोकसेवक याबाबत माजी सरपंच जीवन लंजे तसेच आदर्श गाव याबाबत माजी सरपंच हेमकृष्ण संग्रामे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक उपस्थित होते.

याप्रसंगी प्रास्ताविक करताना मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड यांनी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत सविस्तर माहिती दिली. महिला व बालकल्याण सभापती सविता ताई पुराम यांनी गाव विकास करण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे सांगितले.

अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी गाव विकासासाठी आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी असे सांगून जिल्ह्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यासाठी तालुका पातळीवर वाचनालय सुरू करावे, अशी मागणी यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली.

जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी मी शासनाच्या नवोदय विद्यालयात शिक्षण घेत प्रशासकीय अधिकारी झाल्याचे सांगत शासकीय योजना प्रभावीपणे राबविल्या जातात याचे आपण एक मूर्तिमंत उदाहरण असल्याचे सांगितले. तसेच जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवर प्रकाश टाकला.

याप्रसंगी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत उत्कृष्टपणे काम करणाऱ्या तसेच सन २०२०-२१,२०२१-२२ या वर्षात जिल्हा स्तरावर पुरस्कार प्राप्त तसेच आर.आर.पाटील योजनेत तालुका व जिल्हास्तरावर क्रमांक पटकावणाऱ्या ग्रामपंचायतीचा सत्कार उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन गजभिये यांनी तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता नरेश भांडारकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्रीमती प्रमिला जाखलेकर यांच्या मार्गदर्शनात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) गोविंद खामकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) नरेश भांडारकर,. कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा सुमित बेल-पत्रे यांच्या निर्देशानुसार पाणी व स्वच्छता विभागाचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी सौरभ अग्रवाल, राजेश उखळकर, भागचंद रहांगडाले, विशाल मेश्राम, मुकेश त्रिपाठी, दिशा मेश्राम यांच्यासह पाणी व स्वच्छता विभागातील सर्व कर्मचारी, पाणी व स्वच्छता अंमलबजावणी सहाय संस्थेचे कर्मचारी तसेच पंचायत विभाग व जिल्हा परिषदेतील इतर विभागाच्या अधिकारी व कर्मचारी आदींनी सहकार्य केले.

**दरम्यान देवरी-आमगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार सहसराम कोरेटे यांना विचारणा करण्यात आली असता त्यानी या मेळाव्यासंदर्भात आम्हाला कुठलीही माहिती देण्यात आली नाही.जिल्हास्तरीय मेळावा असतांना आम्हाला डावलण्यात आल्याने यावर आम्ही सरकारकडे जाब विचारणार असल्याचे बेरार टाईम्सला सांगितले.**

**अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांना विचारणा करण्यात आली असता आम्ही लाखो लोकांचे प्रतिनिधीत्व करीत असतांना अशा शासकीय कार्यक्रमात आम्हाला न बोलावण्यामागची काय भूमिका आहे,याचा विचार करुन शासनाकडे आम्ही विचारणा करुन त्यासंदर्भात आम्ही हक्कभंग दाखल करण्यासंदर्भात निर्णय घेऊ असे सांगितले.**

## पशुसंवर्धन विभागाच्या फिरता दवाखाना वाहनावर मुख्यमंत्री शिंदेंऐवजी ठाकरेंचेच छायाचित्र



**गोंदियाः-** राज्यात महाविकास आघाडीची सत्ता जाऊन ८ महिने लोटले. मात्र, गोंदिया जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाच्या फिरता दवाखाना वाहनावर अजूनही उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्री असल्याचे माहिती फलक (स्टीकर्स) दिसून येत आहे. पशुसंवर्धन विभाग अद्ययावत कधी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पशुसंवर्धन विभागाला भेट दिली असता, कार्यालयाच्या आवारात ही वाहने दिसून आली. त्यावर वर्तमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंऐवजी तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे छायाचित्र अजूनही कायम आहे. राज्यात सत्तांतर झाले हे जरी खरे असले तरी वाहनावर पोस्टरव्दारे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे छायाचित्र बदलण्यास विभाग कसे काय चुकले अशा चर्चांना उधाण आले आहे.दरम्यान जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. कांतीलाल पटले यांनी वाहनावरील छायाचित्र बदलण्याकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा करुन त्यांच्या आदेशानुसारच कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रसारमाध्यमांना सांगितले.

## आमगाव नगरपरिषदेतील आठ गावांची मध्यप्रदेशात विलीनीकरणाची मागणी

**आमगाव:** राज्य सरकारचे दुर्लक्ष व वेळकाढू धोरणामुळे गोंदिया जिल्ह्यातील आठ गावे मध्यप्रदेशला विलीनीकरणाची मागणी आमगाव नगर परिषद क्षेत्रातील नागरिकांनी केली आहे. यात आमगाव, बनगाव, किडंगीपार, माल्ही, पदमपुर, कुंभारटोली, बिरसी, रिसामा ही गोंदिया जिल्ह्यातील आठ गावे त्यांचे विलीनीकरण सीमावर्ती राज्य मध्यप्रदेश येथे करावे या मागणीसाठी २७ फेब्रुवारी २०२३ ला येथील स्थानिक नागरिकांनी तहसील कार्यालय गाठून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावे तहसिलदारांना निवेदन सादर केले.

सदर आठ गावातील लोकसंख्या जवळपास ४० हजार असून त्यांचे राज्य सीमावर्ती भाग हा मध्यप्रदेश राज्याला लागून आहे. महाराष्ट्र सरकारने मागील आठ वर्षांपासून नगर पंचायत ते नगरपरिषद स्थापनेचा वाद निर्माण करुन सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ट ठेवले आहे. सदर न्याय प्रविष्ट प्रकरणामुळे राज्य सरकारने प्रशासक कारभार सुरू ठेवला आहे. यामुळे २०१४ नंतर याठिकाणी सार्वत्रिक निवडणूक झाली नाही. लोकप्रतिनिधी निवडणूक झाली नसल्याने व योजना विकास निधी मंजूर करण्यात आले नाही. त्यामुळे या भागाचा विकास झाला नाही.सदर भागाचा भौगोलिक परिस्थिती पाहता या ठिकाणी महाराष्ट्र राज्य सरकारने मागील १३ वर्षांपासून या ठिकाणी राज्य व केंद्र सरकारच्या योजना बंद करून नागरिकांना मूलभूत विकासापासून रोखले आहे. या आठ गावांना मध्यप्रदेश राज्यात विलीनीकरण करुन राज्य व केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करुन विकास करावा अथवा केंद्रशासित भाग घोषित करावा, अशी मागणी आमगाव नगर परिषद संघर्ष समितीने केली आहे. यावेळी समितीचे रवी क्षीरसागर, यशवंत मानकर, संजय बहेकार, उत्तम नंदेश्वर, रितेश चुटे, भोला गुप्ता, मुन्ना गवळी, विजय नागपुरे, महेश उके, राहुल चुटे, प्रभादेवी उपराडे, बाळू वंजारी, पिंकेश शेंडे, राधाकिसन चुटे, इकबाल पठाण आदी कार्यकर्ते उपस्थित होते.




## शासनाची फसवणूक करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल,आरोपी फरार

**गोंदिया–** गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातंर्गत गेल्या अनेक महिन्यापासून चर्चेत असलेल्या कंत्राटदार पी.ए.बग्गा प्रकरणात जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्यावतीने दाखल करण्यात आलेल्या तक्रारीच्या आधारे सुमित प्रितपाल सिंह बग्गा यांच्याविरुद्ध गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यात शासनासोबत धोकाधडी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सुमित बग्गा विरुध्द गोंदिया ग्रामीण पोलिसांनी वडीलाच्या मृत्यूनंतरही पॉवर ऑफ अटर्नी असल्याचे दस्तावेज सादर करुन निविदा प्राप्त केल्याप्रकरणी अपराध क्र.८०/२०२३ कलम ४१७,४२०,४६५,४६८ भांदवी अंतर्गत २४ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.सदर गुन्हा दाखल होताच जिल्हा परिषदेची फसवणूक करणारा सुमित प्रितपाल सिंह बग्गा हा आपल्या राहत्या घरातून बेपत्ता असल्याने गोंदिया ग्रामीण पोलिसांनी तपासाकरीता तामिल केलेले पत्र घराला कुलूप असल्याने पोचले नाही.यावरुन सदर गुन्ह्यातील व्यक्ती हा अटकेपासून बचाव करण्याकरीता घरून फरार झाल्याची चर्चा आहे.या प्रकरणातील तपासासंदर्भात पोलीस निरिक्षक सचिन म्हेत्रे यांना विचारणा केली असता जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्यावतीने देण्यात आलेल्या कागदपत्रांची सत्यता पडताळणी सुरु असून स्वाक्षरी पडताळणीही केली जाणार असल्याचे सांगितले.तसेच या प्रकरणात जिल्हा परिषदेत आलेल्या पहिल्या तक्रारीचा संदर्भ असून त्या तक्रारदाराचेही साक्ष या प्रकरणात नोंदवावे लागणार असल्याचे सांगितले.तसेच निविदाप्रकियेच्या सुरवातीच्या पहिल्यादिवसापासूनच्या सर्व प्रकियेची तपासणी याप्रकरणात करावे लागणार असल्याचेही सांगितले.


**रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर (सेंट्रल) रुल्स १९५६ अंतर्गत साप्ताहिक वर्तमान पत्र बेरार टाईम्स च्या स्वामित्व तथा इतर विषयक माहिती**

**घोषणापत्र (फॉर्म ४)**

१) प्रकाशन स्थान:-डोलारे एजन्सी समोरील रस्ता चंचलबेन स्कूल रोड गोंदिया
२)प्रकाशन कालावधी:-साप्ताहिक
३)मुद्रकचे नाव:-अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, पत्ता:-लोकजन भवन तकिया वॉर्ड भंडारा
नागरिकत्व:-भारतीय
४)प्रकाशकाचे नाव:-खेमेंद्र हिरदीलाल कटरे
पत्ता:-डोलारे एजन्सी समोरील रस्ता, चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया
नागरिकत्व:-भारतीय
५)संपादकाचे नाव:-खेमेंद्र हिरदीलाल कटरे
पत्ता:- डोलारे एजन्सी समोरील रस्ता शिवनगर गोंदिया
नागरिकत्व:-भारतीय
६)वर्तमान पत्राचे स्वामित्व:-खेमेंद्र हिरदीलाल कटरे
मी खेमेंद्र हिरदीलाल कटरे आपली पूर्ण माहिती जाहीर करतो की, वर दिलेली माहिती पूर्ण सत्य आहे.
दिनांक:-०१ मार्च २०२३ स्थान:- गोंदिया





## संपादकीय

# मानवाधिकाराची दुकाने

शासकीय, निमशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून अनेकदा व्यक्तींच्या मूलभूत अधिकाराचे हनन होते, काही प्रसंगात अनेकांना मानवी हक्क सुद्धा नाकारले जातात अशावेळी त्यांच्या मानवी हक्काचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांच्या पाठीशी उभी राहणारी दुसरी सरकारी यंत्रणा म्हणून आपल्या देशात १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना झाली. पुढे त्याला देशाच्या संसदेने 'मानव अधिकार संरक्षण अधिनियम २००६' करुन अधिकृत दर्जा प्रदान केला. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि त्या त्या राज्याचा राज्य मानव अधिकार आयोग अश्या केवळ दोनच अधिकृत संस्था सध्या कार्यरत आहेत. या दोन्ही संस्था स्वायत्त असून त्यांना कायद्याचे संरक्षण आणि अधिकार प्राप्त झालेले आहेत. या आयोगावर काम करणाऱ्या अध्यक्ष आणि सदस्यांना अर्धन्यायिक अधिकार असतात त्यामुळे कोणत्याही प्रकरणात मानवाधिकार आयोगाने लक्ष घातले की भल्याभल्यांचे आपल्या देशात धाबे दणाणते असे म्हटले जाते.

या दोन अधिकृत आयोगांच्या शिवाय सध्या आपल्या देशात आणि राज्यात मानवाधिकार ही नवे घेऊन किंवा त्याच्या मागेपुढे विविध विशेषणे लावून काम करणाऱ्या संघटनांचे पेव फुटलेले आहे. मानवाधिकार संघटना, मानवाधिकार फौंडेशन किंवा आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघ इत्यादी नावाने कार्यरत असणाऱ्या कोणत्याही संघटनांना काडीचीही किंमत नाही हे लक्षात घ्या. पत्रकारिता कशाशी खातात याची धड माहिती नसताना हजारो लोक जसे बोगस पत्रकार संघटनांची ओळखपत्रे गळ्यात लटकावून फिरत असतात तशीच गत मानवाधिकार बाबत सध्या झाली आहे. सध्याच्या घडीला आपल्या देशात मानवाधिकार नावाने किमान चारशे ते पाचशे संघटना कार्यरत आहेत. नोंदणी शुल्क घेऊन आणि वरुन ओळखपत्राची रक्कम घेऊन कुणालाही सहज मानवाधिकार संघटनांचे कोणत्याही पदाचे ओळखपत्र घेऊन आपल्या परिसरात दुकानदारी सुरु करता येते.

केंद्र सरकारच्या अखत्यारीत असणाऱ्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे न्यायमूर्ती अरुणकुमार मिश्र हे अध्यक्ष असून ज्येष्ठ माजी सनदी अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे त्याचे आपल्या राज्यातील सदस्य आहेत. केंद्र आणि राज्य मानवाधिकार आयोगाच्या शिवाय इतर सगळ्या संघटना याना कोणतेही अधिकार नाहीत, लोकांनी किंवा सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनी सुद्धा अशा संस्थांची वैधता तपासून घ्यावी. जर या संघटनांचे पदाधिकारी पैसे किंवा कागदपत्रे मागत असतील तर त्यांची पूर्तता कुणीही करूनये, गरज वाटल्यास नजीकच्या पोलीस किंवा इतर सरकारी यंत्रणांकडे त्याची तक्रार करावी आणि त्याची माहिती राज्य मानवाधिकार आयोगाला द्यावी असे आवाहन डॉ. मुळे यांनी केले आहे. केंद्रीय मानव अधिकार आयोगाकडे सुद्धा आजवर अश्या संघटनांच्या तक्रारी आल्या आहेत. वेळोवेळी त्यांच्यावर आयोगाच्या वतीने त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे देखील त्यांचे म्हणणे आहे.

सरकारी कर्मचारी प्रामुख्याने पोलीस खात्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांना एखाद्या प्रकरणात पकडून त्यांना खंडणी मागण्याचा धंदा अशा अनेक संघटना उघडपणे करीत असतात. राष्ट्रीय म्हणवून घेणाऱ्या या संघटनांची मुख्यालये दिल्लीत असून तेथून सगळ्या राज्यात नियुक्त्या आणि ओळखपते वाटप केली जातात. मानवाधिकार संघटनेचे एखादे पद किंवा ओळखपत्र मिळाले म्हणजे लोकांना लुबाडण्याचा परवाना मिळाल्याचे समजून अनेकांनी हा नवा व्यवसाय सुरु केला आहे. सरकारी कार्यालयात काहीही अडचण असल्यास आमच्याकडे या असे आवाहन करून कामे अडलेल्या लोकांना बोलावून त्यांच्या माध्यमातून सरकारी कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेलिंग केले जाते. अश्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष झाल्यावर वर्षभरात चारचाकी घेऊन तिच्यावर मोठ्या अक्षरात अध्यक्ष मानवाधिकार संघटना अशी दिमाखदार पाटी लावून, अनेकदा शासकीय चिन्हाचा वापर करुन फिरणाऱ्या भामट्यांचे प्रमाण वाढले आहे.

या संघटनांचे पोलीस विभाग हा सॉफ्ट टार्गेट असतो कारण तुरुंग आणि पोलीस खात्यात आरोप आणि कच्चे कैदी याना अमानुष वागणूक दिल्याची अनेक प्रकरणे घडतात. पोलीस कोठडीतही आरोपीना बेदम मारहाण केली जाते, अनेकदा त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केले जाते. अशी प्रकरणे कानावर येताच या संघटना आनंदी होऊन कामाला लागतात.

चहापेक्षा किटली गरम या उक्तीनुसार पदाधिकाऱ्यापेक्षा लेटरहेड कडक असते त्याचा वापर करीत खालच्या कर्मचाऱ्यांना जेरीस आणले जाते आणि एका वळणावर त्याच्याकडून अपेक्षित पैसा वसूल केला जातो. या प्रकरणात अनेकदा काही लालसी पोलीस अधिकारी, कर्मचारी सुद्धा सामील असतात. सरकारने अशा पावसाळी छत्रीसारख्या उगवलेल्या संघटनांवर कायमस्वरुपी लगाम लावण्याची गरज आहे. कोणत्याही कारणाने अडचणीत आलेल्या लोकांनी आणि कर्मचाऱ्यांनी सुद्धा विवेक वापरुन त्यांच्या विरोधात योग्य ठिकाणी दाद मागितली पाहिजे.

## डॉ प्रभाकर लोंढे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित



**गोरेगाव:** स्थानिक शहीद जाण्या तिम्या जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथे प्राचार्य पदावर कार्यरत असलेले डॉ. प्रभाकर लोंढे यांना महाराष्ट्र शासना व्दारा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.२४ जानेवारी २०२३ ला मुंबई येथील रंग शारदा सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे शिक्षण क्षेत्रातील प्रमुख अधिकारी तसेच केंद्रीय मंत्री मंगल प्रसाद लोढा व इतर मान्यवरांच्या उपस्थिती पार पडलेल्या भव्य सोहळ्यामध्ये त्यांना हा पुरस्कार सपत्नीक प्रदान करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रामध्ये संशोधक, साहित्यिक व शिस्तप्रिय कर्तव्यनिष्ठ उपक्रमशिल प्राचार्य म्हणून विशेष ओळख असलेल्या डॉ. प्रभाकर लोंढे यांच्या शिक्षण क्षेत्राला असलेल्या विशेष योगदानाबद्दल हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाने बहाल केलेला आहे.

शिक्षण क्षेत्रातील त्यांची उच्च शैक्षणिक अर्हता, शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे राज्य स्तरापर्यंत दिलेले योगदान, विज्ञान प्रदर्शनातील प्राविण्य, पाठ्यपुस्तक मंडळास पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये योगदान, मराठी विश्वकोशातील शिक्षण विषयक नोंदी लेखनामधील योगदान, बालभारती साठी लघु शोध निबंध, क्यू आर कोड च्या माध्यमातून अध्यापन साहित्य निर्मिती, प्रभावी विविधांगी शैक्षणिक नवोपक्रम, आंतरराष्ट्रीय परिषदेतील सहभाग, आकाशवाणीच्या माध्यमातून अभ्यासक्रमावर आधारित मुलाखतींचे प्रसारण, याशिवाय शैक्षणिक संशोधनपर शोधनिबंध लेखन, वृत्तपत्रांमधून संपादकीय लेखन, नाविन्यपूर्ण उपक्रमांवर लेखन, तसेच विविध विषयांवर संशोधन पर पुस्तके, काव्यसंग्रह, नाट्यसंग्रह यांचे प्रकाशन ही शैक्षणिक व सहशालेय कार्य यासाठी हा पुरस्कार त्यांना देण्यात आलेला आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# वाशीम जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीचा इतिहास

महात्मा जोतीराव फुले आणि त्यांचे सहकारी यांनी दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात महाराष्ट्रव्यापी पहिली बहुजनांची संघटना "सत्यशोधक समाज" या नावाने उभारली. तुकाराम नाईक यांच्या घर नं.५२७,पुणे येथे सत्यशोधक समाजाचे कार्य सुरु झाले. त्यावेळी वऱ्हाडचे बापुजी हरि शिंदे, बुलढाणा हेही उपस्थित होते. ते समाजाचे स्तुत्य व खरे हेतू पाहून सभासद झाले. शिंद्यांच्या घरचऱ्या सत्यशोधकी वातावरणामुळे बापुजी शिंद्यांची मुलगी ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली "स्त्री पुरुष तुलना' हे क्रांतीकारक पुस्तक लिहिले. ते शिवाजी छापखाना, पुणे येथून प्रसिद्ध ही केले. जोतीराव फुलेंच्या काळात वऱ्हाडात सत्यशोधक समाजाचे कार्य बुलढाणा जिल्ह्यात होते. १९०० साली शास्त्री नारोबाजी महाघट आणि शास्त्री धर्माजी रामजी डुंबरे, ओतुरकर हे वऱ्हाडात आले. त्यानंतर बहुजन समाजाचे पहिले संपादक "दीनबंधुकार' कृष्णराव भालेकर वऱ्हाडात आले. अमरावती जिल्ह्यातील करजगाव, बेलुरा, नायगाव इत्यादी ठिकाणी त्यांच्यामुळे समाजाच्या कार्यास वेग आला.

### अकोला जिल्ह्यात सत्यशोधक चळवळीचा प्रसार-प्रचार

विदर्भात सत्यशोधक समाजाची अधिकृत स्थापना अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात वाडेगाव येथे झाली. त्यावेळी जिल्ह्यातील वाडेगावचे भगवान मोहनाजी पाटील (मानकर) हे सत्यशोधक समाजाचे वऱ्हाडचे प्रचारक होते. अकोला जिल्ह्यात सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. त्यामध्ये कजबे पातुर सेकबाबू, ता.बाळापूर येथ ही सत्यशोधक समाज शाखा स्थापन झाली. वाडेगाव येथील शाखेने समाजाची कार्यकरिणी तयार केली. याच शाखेने पुढे सत्यशोधक समाजाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला.

या जाहिरनाम्यानुसार बरीच गाव वर्तन करीत होते. याच काळात सत्यशोधक समाजाच्या प्रभावाने ब्राम्हणेत्तर समाज धार्मिक विधी ब्राम्हणाकडून न करवून घेता ब्राम्हणेतरांकडून करुन लागला. त्यामुळे ब्राम्हणांनी चिडून जाऊन ब्राम्हणेतरांवर कोर्टात दावे दाखल केले. १९०५ साली प्रसिद्ध झालेल्या सत्यशोधक समाजा जाहिर खबर या पुस्तकाली नोंदीनुसार १९०१ सालापासून १००० वर सत्यशोधक समाजाच्या मताप्रमाणे धर्मासंबंधी इव्यकाव्य कर्मे केली गेली.

### अकोला येथे आठवी सत्यशोधक परिषद

दि.१३ व १४ एप्रिल १९१८ रोजी टाऊन हॉल, अकोला येथे आठवी सत्यशोधक परिषद घेण्यात आली. त्यामध्ये आताच्या वाशीम जिल्ह्यातून विठोली ता.मानोरा येथील रामजी हागे पाटील, सत्यशोधक जलसाकार हे उपस्थित होते.

या परिषदेत एकूण पंधरा ठराव पारीत करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्री-शिक्षण, बालविवाहास बंदी, प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे यावर भर देण्यात आला. मागासलेल्या व अस्पृश्य विद्यार्थ्यांना हायस्कूल प्रवेशाच्या वेळी विशेष सवलतीची मागणीही करण्यात आली.

### कवठळ ता.मेंगरूळपीर येथे महार परिषद

दि.३० एप्रिल व १ मे १९२४ रोजी ग्राम कवठळ येथे अकोला जिल्हा महार परिषद, भरविण्यात आली. त्यामध्ये त्र्यंबकराव जयवंतराव देशमुख (तामसीकर) ता.बाळापूर हे स्वागताध्यक्ष होते. तर गणेश आकाजी गवई अध्यक्ष होते. उपाध्यक्ष अजाबराव दौलतराव देशमुख होते. गणपत गाडगे, बापूना सोनोने, किसन भगत इत्यादी कार्यकर्ते या परिषदेत कार्यरत होते. या परिषदेमागे सत्यशोधक समाजाचीच प्रेरणा होती.

### ब्राह्मणेतरांचा राजकीय सहभाग

सत्यशोधक समाजाचे राजकीय अंग म्हणून ब्राह्मणेत्तर पक्षाकडे पाहिले जात होते. विदर्भात नंतर ह्या पक्षाच्या विविध परिषदा सर्वत्र झाल्या. ब्राह्मेतरांच्या राजकीय सहभागावर महाराष्ट्रभर त्यावेळी चर्चा घडत होत्या. १९२५ च्या प्रांतिक निवडणुकीत वऱ्हाड मध्यप्रांतात ब्राह्मेनंतर पक्षाचे मंगरुळपीर वाशीम मधून राजूरा (राव) येथील ॲड. जयसिंगराव राजूरकर, ता.मालेगाव (पुर्वीचा वाशीम) हे उमेदवार निवडून आले होते.



**सतीश जामोदकर**
अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगरजवळ
अमरावती मो.९४२३३७४६७८

### वाशीम तालुका ब्राह्मेतर परिषद

वाशीम तालुका ब्राह्मेतर परिषद शिरपूर (जैन) २० जानेवारी १९२९ ला भालचंद्र खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी आनंदस्वामी व डॉ. गो.ह.चव्हाण यांची उपस्थिती होती. डॉ. गो.ह. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली मेहकर तालुका ब्राह्मेतर परिषदेचे ४ थे अधिवेशन दि.१९ फेब्रुवारी १९३३ ला संपन्न झाले. डॉ.गो.ह. चव्हाण यांनी वाशीम, बुलढाणा जिल्ह्याच्या परिसात आपल्या कार्याने मोठ्या प्रमाणात जागृती केली.

### महात्मा जोतीराव फुलेंच्या पुतळ्यास विरोध, घटनेचा निषेध

सन १९२५ साली सत्यशोधक ब्राह्मेतर नेते केशवराव जेधे यांनी पुणे येथे महात्मा फुलेंच्या पुतळा उभारावा असा ठराव पुणे नगरपालिकेत मांडला असता तो नामंजूर केला तेव्हा त्या घटनेचा निषेध म्हणून महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर शेकडो गावी सभा भरवून जनतेने पुणे नगरपालिकेचा व महात्मा फुल्यांवर प्रच्छत्र आरोप करणाऱ्यांचा निषेध केला. त्यामध्ये वाशीक जिल्ह्यातील कुपटा, महागाव, पोहायात्रा, धोडप, मंगरुळपीर व वाशीम येथील जाहिर सभांचा उल्लेख आहे. यावरून महात्मा फुलेंच्या विचारांचा खेड्यापाड्यात प्रभाव होता असे दिसते.

### कचरु एम.जुमळे (रिसोड)

कवरु एम.जुमळे हे आंबेडकरी चळवळीतील कार्यर्ते होते. त्यांचा जन्म १९०७ साली रिसोड येथे झाला. त्यांचे शिक्षण वर्ग ९ वी पर्यंत झालेले होते. काही काळ शिक्षणासाठी ते अकोला येथील जानोजी वसतिगृहात होते. त्यांच्यावर सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव होता. १९२७ साली चिखली तालुक्यातील सत्यशोधक पंढरीनाथ सिताराम पाटील यांचे सातगाव भुसारी येथे भाषण ऐकले. तसेच इतरही सत्यशोधकांचे भाषणे ऐकूण त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांना पटले. या सभेमध्ये त्यांना के.आर. इंगळे नावाचे गृहस्थ भेटले. दोघांनी मिळून १ जुलै १९२९ रोजी अधिकृत चोखामेळा बोर्डिंगची कार्यकारिणी गठित केली. त्यामध्ये अध्यक्ष एम.आर. डुबे, ऑ.मजिस्टेट, उपाध्यक्ष डी.बी. कोल्हटकर बी.ए.एल.एल.बी., उपाध्यक्ष एम.आर.पाटील ऑ.बेंच मजिस्टेट, खजिनदार, आर.डब्ल्यू सोमन ॲडव्होकेड, सभासद एस.एन.पांडे, ऑ. मजिस्टेट, एम.के. खेर्डेकर, आर.जी.राठी, के.आर.वाघमारे, सेक्रेटरी के.एम. जुमडे म्हणून नियुक्ती करण्यात आली.

के.एम.जुमडे यांनी वाशीम तालुक्याच्या परिसरातील इतर बहुजन समाजाच्या व्यक्तींनी मदत केली. त्यामध्ये त्यांचे मित्र गोवर्धना येथील लक्ष्मणराव माळकरी महाराज, शंकरराव ढवळे, अनसिंग येथील गंभीरराव धुळधुळे, मसला येथील दगडूजी डमणीवाले, गोपाळराव सिदाजी देशमुखम, शेठ जठमल शिवराम बगडे, दादा कविमंडळ, सेठ द्वारकादास, आनंदराव पिराजी देशमुख (मोठेगाव), साहेबराव पाटील (करडा), उकंडराव टाले इत्यादी मंडळींनी त्यांना त्यांच्या कार्यात मदत केली. तसेच केकत उमरा येथील धर्माजी पट्टेबहादूर, मालेगाव येथील बाळाजी पखाले, मेडशी येथील तुकाराम तायडे, पांगरी कुटेचे परशराम गायकवाड, रिठ्द येथील राणोजी अंभोरे, सुकांडा येथील देमाजी इंगळे, कवठा येथील डॉ. फकीरा आमाजी साबळे, नामदेव अंभोरे, (गोवर्धन) आश्रुजी व महीपती वानखडे, (चिखली), हराळ येथील खंडूजी यांनी देखील मदत केली.

### कोंडोली ता.मानोरा येथे सत्यशोधक समाज शाखा

ब्राह्मेतर पक्षाच्या काळात सुद्धा वाशीम जिल्ह्यातील कोंडोली येथे २८ फेब्रुवारी १९३३ साली शिवराम नारायण पाटील (पाळोदी) यांनी सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली होती. त्या शाखेची कार्यकारिणी जाहिर करण्यात आली होती. त्यामध्ये अध्यक्ष म्हणून बळीराम नरसिंगराव मराठे, उपाध्यक्ष वामन उदेभाव मराठे, सेक्रेटरी डॉ.आनंदराव नानाजी देशमुख तर शाखेचे सभासद म्हणून नारायण कान्हुजी तायडे, शिवराम रामजी तिलवंत, लक्ष्मण भिवाजी तायडे, बळीराम उदेभान कडबे (धनगर), विश्वनाथ जानबा माळी, बिराम ईस्माईल, गेंदा गुलाब, बंडू नारायण पवार, उदेभाव परशुराम मराठे या शाखेच्या स्थापने मागची प्रेरणा गुलाबराव नायगावकर यांची होती. या मंडळींनी कोंडोलीच्या आसपासच्या गावात प्रबोधन जनजागृती केली. त्यामुळे शिक्षण प्रसार वाढला हीच मंडळी पुढे स्वातंत्र्य चळवळीत कार्यरत झाली.

### वस्ताद के.एस.कांबळे (गिरोली)

वस्ताद के.एम.कांबळे यांचा जन्म १९१५ साली झाला. त्यांचे शालेय शिक्षण विठोली येथील जि.प. प्राथमिक शाळेत झाले. त्यांच्यावर रामजी हागे पाटील यांच्या सत्यशोधक जलशाचा प्रभाव होता. त्यांनी १९१९ साली निंबी येथे नोकरी केली. सत्यशोधकांच्या सभा जलशाद्वारे त्यांना बाबासाहेबांचे नाव ऐकायला मिळाले. अन्याय-अत्याचार विरोधात लढण्याकरिता त्यांनी गावागावात आखाड्याची निर्मिती केली. समता सैनिक दलाचा शिपाई म्हणून सुद्धा त्यांनी कार्य केले. त्यांच्या कार्याला सत्यशोधक पार्श्वभुमी होती.

### वाशीम शहरातील माळी समाजाचा सत्यशोधक चळवळीत सहभाग

वाशीम शहरात अंबुजी उल्हामाले, परसाजी उल्हामाले, जयाजी वानखेडे, हिराजी बाबजी वानखेडे ही मंडळी सत्यशोधकी जलशाप्रमाणे दंडार सादर करुन बहुजन समाजात लोकजागृती करीत होते. वाशीम शहरात कालकथित रामभाऊ खंडूजी वानखेडे हे महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे वशीम मधील मूळ कार्यकर्ते होते. त्यांनी बऱ्याच लोकांना महात्मा फुलेंच्या कार्याची माहिती देऊन त्यामुळे लोकांना प्रेरणा मिळाली. दिवंगत नारायण देवबा केन्दळे हे या कार्याचे म्होरके होते. तसेच पिराजी शंकरराव वानखेडे, विठ्ठलराव अर्जुन इंगोले, राजाराम शंकरराव वानखेडे, मधुकर देशमुख ही मंडळी महात्मा फुलेंच्या विचारावर कार्य करीत होते. राजाराम वानखेडे आणि इतर मंडळी महात्मा फुले यांचा स्मृतीदिन सार्वजनिक रूपात साजरा करीत होते. महात्मा फुलेंचे चरित्र लेखक तत्कालीन खासदार पंढरीनाथ पाटील रजनीताई सातव (माजी आमदार), दिवंगत आनंदराव लढके, सत्यशोधक वीर उत्तमराव मोहिते पाटील यांना वाशीम येथे भाषणाकरिता बोलाविले होते. सावित्रीबाई फुले महिला प्रबोधिनी इंदूमती राजाराम वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली होती.

### पाराव ता.मानोरा येथे कलापथकाद्वारे लोकजागृती

पारवा ता.मानोरा येथील आप्पास्वामी नाट्य कला मंडळ धर्मद्रोही ब्राह्मण या नावाचे कलापथक सादर करीत असत.त्यामध्ये खालील मंडळी विविध भूमिका करीत होती. उदेभानजी क्षिरसागर (बाह्मण), डॉ. भास्करराव चतूर (बाह्मणाचा मुलगा), श्रीराम भोयर (कोलाटीन) तर वसंत जाधव हे पाटलाची भूमिका सादर करीत असत. या कलापथकात आपल्या फायद्याकरिता ब्राह्मण बहुजन समाजाला धर्माचा अर्थ वेगवेगळा व सोईचा लावून कसे वापरुन घेतो याचे चित्रण ही मंडळी करीत असत. घराचा वास्तू, सत्यनारायण पूजा इत्यादी प्रसंगातून कलापथकाच्या माध्यमातून ही मंडळी प्रबोधन करुन ब्राह्मणाचे खरे स्वरूप दाखविण्याचा प्रयत्न करीत होते.

# "विद्रोहातून,क्रांतीतून 'करुणा' वजा केली तर!"

गाडगे महाराजांनी कठोरपणे देवावर टीका केली असेल, पंढरपुरात जाऊन ते पांडुरंगाच्या दर्शनासाठी मंदिरातही गेले नसतील, पण तेथे येणाऱ्या वारकऱ्याला 'कशाला येथे येतोस मारायला' असं कधी म्हणाले नाही. त्याची त्या गर्दीतील गैरसोय बघून, निवाऱ्याला जागा नाही, हे बघून त्यांनी त्यांच्यासाठी करूणेतून धर्मशाळा बांधली. विद्रोहातून, क्रांतीतून 'करुणा' वजा केली तर केवळ क्रोर्य शिल्लक राहतं. याचही भान विद्रोहींनी बाळगलं पाहिजे. द्वेषाच्या या वातावरणात परस्परांवर प्रेम करणं हा सुद्धा विद्रोह ठरू शकतो. याची मला जाणीव आहे. माणसा माणसांनी दंगलीत केलेल्या परस्परांच्या कत्तलीतून झालेल्या रक्तमांसाच्या चिखलातूनच कमळ चांगला फुलते, याची कमळीवाल्यांना चांगलीच जाणीव आहे. आणि द्वेषाच्या वातावरणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विषाणूचं पोषण होतं. याची कल्पना रेशीम बागेतील भागमभाग करणाऱ्याला आहे. त्यामुळे त्या विषाणूंना पोषक ठरणाऱ्या द्वेषाला दूर सारत प्रेमाचा अंगीकार करणे, हा सध्याच्या काळातील विद्रोह ठरणार आहे. असे घनाघाती प्रहार विद्रोही साहित्य संमेलनाध्यक्ष मान. चंद्रकांतदादा वानखेडे यांनी वर्धा येथील सतराव्या अखिल भारतीय विद्रोही साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी भरगच्च भरलेल्या मंडपात केले.

४ फेब्रुवारी २०२३ ला सकाळी नऊ वाजता अखिल भारतीय विद्रोही साहित्य संमेलनाची विचारयात्रा सुरू झाली. वर्धा जिल्ह्यातील पाथरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील धैर्यवान स्त्री मा. सुनंदा चरडे या भगिनीला प्रस्तुत विचारयात्रा प्रारंभ करण्याचा सन्मान मिळाला. शिवाजी पुतळ्यापासून यात्रेला अलोट गर्दी जमू लागली. बघता बघता वर्धा नगरीच्या मुख्य रस्त्यावर सुमारे एक-दिड किमी. लांब विचारयात्रेतील आदिवासी नृत्य, लेझीम मोरपंखी मुकुटधारी आदिवासी -डफावरील- नृत्य, सिबली नृत्य, विविध महामानवांच्या वेशभूषा केलेले चित्ररथ, सजवलेल्या बैलगाड्या आणि शिस्तीत चालणारे विचार पेरणारे संमेलनाचे अध्यक्ष, प्रमुख वक्ते, आयोजक, संयोजक, कार्यकर्ते आणि विद्रोही प्रवाहाचे वारकरी यांचे पथसंचलन मुख्य आकर्षणाचा बिंदू ठरला. ही विचारयात्रा इतकी वैविध्यपूर्ण ठरली की संपूर्ण वर्धा नगरी विद्रोहीच होऊन गेली. समाजमाध्यम, पत्रकार, वृत्तवाहिन्या यांचे प्रतिनिधी प्रत्येक क्षण टिपण्यास सरसावत असताना जोशपूर्ण नारे आणि क्रांतीगीतांचे गायन यामुळे अवघा विचारयात्रापथ दुमदुमून गेला होता. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा, शिवाजी महाराज, अहिल्याबाई होळकर, भगतसिंग, यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून विद्रोहीचे जणू त्यांना आवतण देत सुमारे दोन ते अडीच तास मार्गक्रमण करत विचारयात्रा संमेलनस्थळी पोहोचली.

संमेलन स्थळावरील सृजनशीलतेने उभारलेले प्रवेशद्वार प्रदर्शनी आणि ग्रंथदालनाचे विनाविलंब उद्घाटन निमंत्रीत मान्यवरांच्या हस्ते सहर्ष पार पडले. विद्रोहीचा मांडव भरगच्च भरलेला. खुर्च्या भरून आजूबाजूला परिसरात विद्रोहीचे साक्षदार होण्यासाठी स्त्री-पुरुष उभे होते. उद्घाटनाला महात्मा फुले रचित सत्याचे अखंड शीतल गावित आणि सत्यशोधक कार्यकर्ते नंदुरबार यांनी गाऊन, अमृत भिल्ल धुळे यांच्या पावरी वादनाने आणि मवंदन माणसाला...फ या वामनदादा कर्डक रचित गीताने गाऊन, अपारंपारिक पद्धतीने कुलुपबंद मानवी मेंदूला चाविने मुक्त करून विद्रोहीच्या शिरस्त्याप्रमाणे नाविन्यपूर्ण उद्घाटन पार पडले.

मान्यवरांचे स्वागतानंतर विद्रोही साहित्य संमेलनाचे प्रास्ताविक मुख्य संयोजक डॉ. अशोक चोपडे यांनी केले आणि विद्रोही चैतन्य निर्माण झाले. स्वागताध्यक्ष प्रा.नितेश कराळे यांचे भाषण आणि प्रा. प्रतिमा परदेशी यांनी विद्रोही सांस्कृतिक चळवळीची भूमिका मांडत असताना विद्रोहीची वाटचाल आणि भूतकालीन सांस्कृतिक लढ्याची वर्तमान वर्तमानकालीन प्रासंगीकता आधोरेखित केली. मा. रसिका आगाशे, मावळते संमेलनाध्यक्ष मा. गणेश विसपुते यांच्या दीर्घ वक्तव्यानंतर स्वागताध्यक्ष चंद्रकांत दादा वानखेडे यांनी केलेली अध्यक्षीय भाषण म्हणजे "सांप्रतची राजकीय सामाजिक परिस्थिती आणि सांस्कृतिक लढा भक्कम करण्यासाठी विद्रोही साहित्य संमेलनाची भूमिका असून या देशातील कष्टकरी श्रमिक संस्कृतीशी विद्रोहाचा धागा किती अतूट आहे" हे दीर्घभाषणातून विशद करणारे ठरले. "विद्रोह हा नकार नसून विद्रोहातून नवनिर्मिती आणि तीही न्याय समतावादी मूल्यांची रुजवणूक, एकमय राष्ट्राकरिता प्रेम, करुणा, बंधुभाव निर्माण होईल अशी व्यवस्था, द्वेष आणि मत्सर यांना नकार म्हणजे विद्रोहाची ललकारी ठरेल." १७ वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी संमेलना अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

उद्घाटनानंतर संघर्ष हेच जीवनाचे ब्रीदवाक्य मानून कार्य करणाऱ्या मान्यवरांना मविद्रोही जीवन गौरवफ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आंबेडकरवादी लेखिका, संस्कृततज्ञ डॉ. कुमुदिनी पावडे; दलित पँथरचे संस्थापक व लेखक मा. ज.वि.पवार; बहुजन संघर्षचे संपादक मा. नागेश चौधरी;




झाडीबोलीचे अभ्यासक डॉ. हरिश्चंद्र बोरकर; भटके-विमुक्त संघटक व प्रश्नचिन्ह शाळेचे संस्थापक मा. मतीन भोसले; ज्येष्ठ सत्यशोधक शिक्षणतज्ञ मा. महादेवराव भुईभार; आदिवासी नेते देवाजी तोफा; शोध पत्रकार स्मृतीशेष सुरेश धोपटे यांना मानपत्र प्रदान करुन गौरविण्यात आले. मान्यवरांनी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा आलेख मानपत्र वाचनातून होत असताना विद्रोहीचा मंडप समतावादी न्यायाच्या लढ्यातील मातब्बर लढवय्यांच्या जीवनातील ऐतिहासिक आठवणींनी उजळून निघत होता. विद्रोही संमेलनासाठी बोधचिन्ह, संमेलनगीत चित्र आदि कलावंताचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

'मराठी साहित्य संस्कृतीला अब्राम्हणी धर्म प्रवाहांनीच समृद्ध केले' या परिसंवादात महानुभाव, सुफी, वारकरी आदी धर्म लिंगायत शाक्य धर्म बौद्ध धम्म या धर्म प्रवाहांच्या अनुषंगाने मा. अविनाश काकडे, हभप धर्मकीर्ती महाराज परभणीकर, प्रा. संतोष सुरडकर यांनी विषयाची मांडणी केली. प्रा. गंगाधर बनबरे यांचे अध्यक्षीय भाषण उपस्थित समुदाय श्रवण करत होते.

'लेखकांची सांस्कृतिक भूमिका काय आहे? काय असावी?' या परिसंवादात मा. संजय जीवने, डॉ. नारायण भोसले, डॉ. मारुती कसाब, प्रभू राजगडकर यांनी विषयावर विस्तृत मांडणी केली. ममहामानवांची बदनामी, माफीवीरांचे उदातीकरण, इतिहासाचे विकृतीकरण आणि संस्कृतीच्या मिराजदारांचे राजकारण या परिसंवादात मा. वैशाली डोळस, सतीश जामोदकर यांनी सद्याच्या राजकीय सामाजिक परिस्थितीच्या अनुषंगाने विश्लेषण केले. तर मा. निरंजन टकले यांचे अध्यक्षीय भाषण विद्रोही साहित्य संमेलनातील प्रमुख आकर्षण ठरले. त्यांच्या मॅराथॉन चाललेल्या अभ्यासपूर्ण गंभीर मांडणीला रसिक कानात प्राण आणून साद देत होते. त्यांच्या भाषणातील आशय संमेलनात सर्वाधिक चर्चिला गेला.

'एकमय राष्ट्र निर्मितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित संविधान संस्कृती' या विषयावरील व्याख्यान मा. हिराचंद बोरकुटे यांच्या मांडणीने झाले.

शेतकरी कष्टकरी समाज व भारतीय समाजवास्तव विकासाचे प्रश्न मागासले पण या आणि अशा विषयाच्या अनुषंगाने प्रेम, धर्म, पर्यावरण, संस्कृती, साहित्य, शिक्षण, शेती नागरिकत्व, जल-जंगल-जमीन, ओबीसीची जातवार जनगणना, प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य, स्त्रियांचे प्रश्न अशा विविध सोळा विषयांवर गटचर्चा आयोजित करण्यात आली. गटप्रमुखांनी विषयांचे सादरीकरण केले त्यातून या विषयांचे अनेक कंगोरे दिसून आले. सांस्कृतिक कला प्रदर्शनी आणि सादरीकरण विद्रोहीचे खास वैशिष्ट्ये ठरले. नागरिकत्व या विषयावरील पथनाट्य, द नेशन लघुनाट्य, संमेलनाच्या पूर्वसंध्येला सादर झालेले 'व्हाया सावरगाव खुर्द' 'क्रांतिबा क्रांतीमा' शो.शि.त. (शोधला शिवाय तर) इत्यादी क्रांतीगर्भातील नाटके, 'ज्योती झाली ज्वाला', 'मी भिडेवाडा बोलतोय', 'मी सावित्री ज्योती महात्मा फुले,' 'सावित्रीच्या लेकीची गाथा', एकपात्री प्रयोग आणि खास वैशिष्ट्यपूर्ण नागपूर येथील शिक्षक मित्रांनी सादर केलेले महात्मा फुले लिखित मतृतीय रत्नफ हे नाटक, महात्मा फुले यांनी मराठी ग्रंथकार सभेस लिहलेल्या पत्राचे वाचन विद्रोहीची सांस्कृतिक परंपरा बलवत्तर किती आहे हे दर्शवितात. कवी व गझलकार संमेलनातील सुमारे तीन- साडेतीनशे कवींचा सहभाग विद्रोही साहित्य निर्मिती समृद्धीचे दर्शक ठरते. बालमंचच्या अंतर्गत विद्यार्थ्यांची वेशभूषा, वक्तृत्व, कविता, पथनाट्य, लेझीम बालकातील विद्रोही प्रतिभा फुलवण्याचे कार्य करताना दिसते. संमेलन स्थळाला शेतकरी आत्महत्या चित्र प्रदर्शन, चित्र काव्य प्रदर्शन, खानदेशातील आंबेडकर चळवळ पोस्टर प्रदर्शन, व्यंगचित्र प्रदर्शन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन दर्शनी यामुळे वातावरणात जिवंतपणा आल्याशिवाय राहत नाही.

विद्रोहीची आतापर्यंत सोळा साहित्य संमेलन विविध ठिकाणी झालीत. प्रचंड गाजलीत. यंदा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती चपळगावकर विद्रोहीच्या मंडपात भेट करते झाले. विद्रोहीचे अध्यक्षांनी आणि आयोजकांनी त्यांचे यथार्थ स्वागत केले. विद्रोहीचा लढा मानवतेसाठी आहे व विचाराने भिन्न असला तरी तो माणूस आहे या मूल्यांचा यातून परिचय घडून आला. विद्रोहाचा सांस्कृतिक वारसा फारच व्यापक आणि प्रदीर्घ काळापासून चालत आलेला आहे. मानवांचे अवघे जीवन व्यापून टाकणाऱ्या या प्रवाहास कित्येकांचे योगदान समृद्ध करत आले. अनार्य, अवैदिक, अवैदिक, मुलनिवासी, अब्राह्मणी, ब्राम्हणेतर, बहुजन अशा विविध नावाने ज्ञात ही धरोहर विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या प्रयत्नातून समृद्ध होत आहे. विद्रोही संमेलनाचे माजी अध्यक्ष मा. गणेश विसपुते, सतरावे विद्रोही साहित्य संमेलनाध्यक्ष मा.चंद्रकांत दादा वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले प्रा. जावेद पाशा आणि इतर वक्तांनी केलेल्या मांडणीतून विद्रोहीचा लढा दिवसेंदिवस विराट होत असल्याचे दिसून येते.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्राचे पदाधिकारी मा. किशोर ढमाले, प्रा. प्रतिमा परदेशी, मुख्य संयोजक डॉ. अशोक चोपडे, स्वागताध्यक्ष नितेश कराळे, यांच्या हातात हात घालून मिलिंद सवाई, वनश्री वनकर, गुणवंत डकरे, राजेंद्र कळसाईत, अनुज हुलके, मीराताई इंगोले, माधुरी शेलोकर, अनिता येवले, वंदना वनकर, पूजा जाधव, ज्योती बनकर, अविनाश पोईनकर, प्रा. जनार्दन देवतळे, सुनील बुरांडे, सुधीर गिरे, नंदकुमार वानखेडे, कपिल थुटे, धनंजय सोनटक्के, मिलिंद जूनगडे, प्रवीण पाटभाजे, श्याम शंभरकर,गिरीधर कोठेकर, नरेंद्र पठाडे, अर्चना भोमले, गजानन बुरांडे, डॉ. रवीदंत कांबळे, शारदा थुटे, बाबा बिडकर, डॉ विश्वनाथ बेताल, प्रदीप ताटेवार, राजू गोरडे, विलास भवरे, उपाली सवाई, राजकुमार मून, संदीप चिचाटे, रवी चावके, मा. अनंता राऊत, बळी खैरे, मोहित सहारे, प्रकाश भेले, गजानन सोरते, शारदा झामरे, श्रीया गोडे,सविता घोडे, चेतना सवाई, पी एस खिलारे, यशवंत फडतरे, अशोक ठाकरे, नूतन माळवी, प्रियराज म्हैसकर, सुधीर गवळी, अशोक कांबळे, शरद वानखेडे, सुनीता काळे प्रा.एकनाथ मुरकुटे, प्रा.सुधाकर सोनोने इ. विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्राचे पदाधिकारी, कार्यकर्ते; विदर्भ-वर्धा जिल्ह्यातील मंडलच्या आंदोलनातून जडणघडण झालेल्या ओबीसी दलित आदिवासी अल्पसंख्यांक विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते किती किती झटले, त्यांच्यातील सख्य, सचोटी, समन्वय, समर्पण विद्रोही साहित्य संमेलनाचे भव्य आयोजनातून दिसून आले. संमेलनांतील ठराव भरगच्च गर्दीने हात उंचावून पारित केले. लेखक कवी चित्रकार पत्रकार नाटककार कलावंत प्राध्यापक शिक्षक आणि असंख्य कार्यकर्ते सुमारे तीन महिने सातत्याने राबले त्यामुळे विद्रोही साहित्य संमेलनास उदंड प्रतिसाद, ऐतिहासिक उत्तुंग यश मिळाले.विचारांची पेरणी करण्यासाठी नांगरलेल्या संमेलनभूमीतून भरगच्च पिक पदरात पडले. उद्याच्या लढ्यासाठी क्रांतीबिजं पुरतील एवढे!

**अनुज हुलके**

# अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पुर्वतयारीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करा-आमदार विनोद अग्रवाल



**गोंदिया :** आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांना अद्ययावत व पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर उच्च शिक्षणाच्या अभ्याक्रमाच्या पुर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे प्रतिपादन आमदार विनोद अग्रवाल यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, गोंदिया येथील सभागृहात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण गोंदिया व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जेईई, नीट, एमएचच-सीईटी परीक्षेचे प्रशिक्षण घेणाऱ्या दहावी उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत टॅबलेट (कव्हर, ईअरफोन, डाटा सीमकार्ड ६ जीबी प्रति दिवस नेट डाटा दोन वर्षाकरीता) श्री. अग्रवाल यांचे हस्ते वाटप करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून उपायुक्त तथा जिल्हा जात पडताळणी समितीचे सचिव राजेश पांडे व समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे मंचावर उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्या विद्यार्थ्यांना आज टॅब मोफत मिळालेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांनी सदर टॅबचा वापर करुन त्याचा फायदा घेऊन आपल्या ज्ञानामध्ये भर पाडावी. तसेच सदर टॅबचा आपल्या पुढील शिक्षणाकरीता योग्य तो वापर करुन आपले भविष्य उज्वल करावे. गोंदिया मतदारसंघात ८६ ग्रामपंचायत आहेत. यावर्षी गोंदिया मतदारसंघातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी १० लाख रुपयांची पुस्तके वितरीत करण्याचे त्यांनी यावेळी आश्वासीत केले.

दहावी उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर उच्च शिक्षणाकरीता पुर्वपरीक्षांची पुर्वतयारी करण्याकरीता आज सन २०२४ च्या बॅचमधील एकूण १४७ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते टॅबचे वाटप करण्यात आले. जेणेकरुन सध्याच्या स्पर्धेच्या युगात इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास वर्ग प्रवर्गाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परीक्षेच्या पुर्वतयारीसाठी सराव करण्यास या माध्यमातून मदत होणार आहे.

महाज्योती मार्फत महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी या हेतूने पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण, जेईई, नीट, एमएचटी-सीईटी, एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते. उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरीता कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो तसेच विविध संशोधन कार्याला प्रोत्साहन मिळावे याकरीता पीएचडी व एम.फिल. करणाऱ्या उमेदवारांना अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते. असे प्रास्ताविकातून समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी सांगितले.

प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समाज कल्याण निरीक्षक श्रीमती स्वाती कापसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार लक्ष्मण खेडकर यांनी मानले. कायक्रमास सहाय्यक लेखाधिकारी संजय भांडारकर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमेय नाईक, विद्या मोहोड, निवास सहारे, लक्ष्मण राऊत, हेमंत घाटघुमर, विद्या मेश्राम व सुरेन्द्र बडोले यांनी परिश्रम घेतले.

# न्यायासाठी सूर्याटोलावासी रस्त्यावर

**गोंदिया :** शहरातील सूर्याटोला येथे माहेरी आलेली पत्नी, मुलगा आणि सासऱ्यावर पेट्रोल टाकून आरोपीने जाळले. यातील तिघांचाही मृत्यू झाला. या घटनेने समाजमन हळहळले. अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये. आधीच तक्रार देवूनही हलगर्जी करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी. जलदगती न्यायालयात प्रकरण चालवून आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या मागणीला घेवून सामाजिक संघटनांच्या वतीने सूर्याटोला येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, महिला व बालकल्याणमंत्री यांच्या नावे निवेदन देण्यात आले.

सूर्याटोला येथील आरती शेंडे हिचे लग्न तिरोडा तालुक्यातील भिवापूर येथील किशोर शेंडे याच्याशी झाले होते. मात्र ते नेहमी तिच्याशी भांडण करत होता. त्यामुळे पत्नी आरती आपल्या मुलासह सूर्याटोला येथे वडील देवानंद मेश्राम यांच्याकडे आली होती. १५ फेब्रुवारीच्या रात्री आरोपी किशोर शेंडे याने पत्नी, सासरा देवानंद शेंडे आणि मुलगा जय शेंडे याच्यावर पेट्रोल टाकून आग लावली. यात तिघांचाही मृत्यू झाला. या घटनेतील आरोपीला अटक झाली. मात्र आरतीने आपल्या पतीविरोधात यापूर्वी तिरोडा पोलिसांत तक्रार केली होती. परंतु, त्याकडे पोलिसांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे दिरंगाई करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. जळीत कांडातील आरोप–

## ग्रामपंचायत करांडली
## पंचायत समिती, अर्जुनी/मोर.
## निविदा सुचना

| | | |
|---|---|---|
| निविदा क्र.6 | | जा.क्र.ग्रा.पं.करांडली नि.सू./351/2023<br>दिनांक:01/03/2023 |

**ग्रामपंचायत करांडली, पंचायत समिती अर्जुनी/मोर., जिल्हा परिषद गोंदिया येथे ग्रामपंचायतस्तर पंधरावा वित्त आयोग निधी अंतर्गत खालील प्रमाणे कामाकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फार्म किंमत | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | मौजा चिचोली/जुनी मध्ये अंगणवाडी/जिल्हा परिषद शाळा शौचालय बांधकाम करणे. | 200000/- | 500/- | 2000/- | - |
| 2 | मौजा चिचोली/नवीन मध्ये जिल्हा परिषद शाळा वर्ग खोली दुरुस्ती करणे. | 200000/- | 500/- | 2000/- | - |

१) वरील कामाची कोरी निविदा फार्म दिनांक ०१/०३/२०२३ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक ०९/०३/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय करांडली येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म खरेदी केल्यानंतर त्याची पावती मिळेल.
२) सदरच्या कामाची निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक ०१/०३/२०२३ ते दिनांक ०९/०३/२०२३ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत करांडली येथे स्विकारण्यात येईल. तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल.
३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक १०/०३/२०२३ ला ग्रामपंचायत करांडली येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. याची विशेष नोंद घ्यावी.
४) सदर कामाची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत कार्यालय करांडलीच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली आहे.

**सौ.एन.पी.खोब्रागडे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत करांडली**

**श्री.सी.आर.शहारे**
**ग्राम विकास अधिकारी**
**ग्रामपंचायत करांडली**

# जिल्ह्यातील ९ कृषी केद्रांचे परवाने निलंबित

**गोंदिया:** जिल्ह्यात उन्हाळी हंगाम सुरु असुन धान पिकासाठी, चिखलनी व वाढीच्या अवस्थेमध्ये शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात रासायनिक खताची मागणी असते. कृषी केंद्र धारकांना पॉस मशिनव्दारे खत विकणे केंद्र शासनाने अनिवार्य केले आहे तथापि जिल्ह्यातील कृषी केंद्र संचालक ऑफलाईन पध्दतीने अनुदानित खताची विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्ह्यातील अशा ०९ कृषी केंद्राचे परवाने निलंबित केल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

तक्रारी प्राप्त कृषी केंद्रामध्ये मोहिम राबवून कृषी केंद्राची तपासणी केली असता अनुदानित खताची ऑफलाईन पध्दतीने खताची विक्री करणे, परवाना ग्राहकास सहज दिसेल अशा ठिकाणी न लावणे, भाव साठा फलक अद्यावत न ठेवणे, परवान्यामध्ये उगम प्रमाणपत्र नसताना निविष्ठा विक्री करणे, साठा व विक्री रजिस्टर न ठेवणे, फॉर्म एन मध्ये साठा नोंदवही न ठेवणे, बिलावर शेतकऱ्यांची स्वाक्षरी न घेणे तसेच बॅच नंबर, उत्पादनाची तारीख न लिहिणे, अशा कारणासाठी ९ कृषी केंद्राचे परवाने निलंबित केल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी दिली.

रासायनिक खताचे परवाने निलंबित केलेल्या केंद्राची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १) डोंगरे कृषी केंद्र, साखरीटोला ता. सालेकसा २) मुन्ना कृषी केंद्र, कोडेलोहारा ता. तिरोडा ३) साठवणे कृषी केंद्र, सरांडी ता. तिरोडा ४) मोना कृषी केंद्र, एकोडी ता. गोंदिया ५) आदर्श कृषी केंद्र, चुटीया ता. गोंदिया ६) मॉ वैष्णवी कृषी केंद्र, मुंडीकोटा ता. तिरोडा या ६ कृषी केंद्राचे परवाने ६ महिनेकरिता निलंबित करण्यात आले. तसेच १) साई कृषी केंद्र, कोयलारी ता. तिरोडा २) गजानन कृषी केंद्र, तिगाव ता. आमगाव ३) राधे कृषी केंद्र, आमगाव खुर्द ता. सालेकसा या ३ कृषी केंद्राचे परवाने ३ महिनेकरिता निलंबित करण्यात आले.

कृषी निविष्ठाची विक्री करतांना कृषी विभागाने दिलेल्या नियम व कायद्यांचे पालन योग्य प्रकारे करण्यात यावे. कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा अनुदानित खताची ऑफलाईन पध्दतीने विक्री करतांना आढळुन आल्यास संबंधित विक्रेत्यांचा परवाना खत नियंत्रण आदेश तसेच अत्यावश्यक वस्तु अधिनियम नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी म्हटले आहे.

# ना राहण्याची सोय, ना जेवणाची, मौजमजा कसली? त्रासच जास्त !



**गोंदिया:** सालेकसा तालुक्यातील हाजराफॉल येथील निसर्गरम्य धबधबा पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र आहे. यापासूनच काही अंतरावर कचरागड हे आदिवासी बांधवांचे एक महत्वाचे श्रद्धास्थान असल्याने शासनाने पर्यटन स्थळाचा दर्जा दिला. काही कामेही सुरू केली. परंतु हाजराफॉल पर्यटनस्थळी जेवनाची राहण्याची कायमस्वरूपी व्यवस्था नाही. त्यामुळे या क्षेत्राचा विकास अजूनही पाहिजे तसा झाला नाही. हाजराफॉल येथील निसर्गरम्य धबधबा पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र आहे. पावसाळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी असते. या ठिकाणी विदर्भातून पर्यटक येत असतात. येथील निसर्ग व धबधब्याचा आनंद घेतात. मुख्य मार्गावरुन जंगल वाटेने आतमध्ये जाताच हाजराफॉल हा धबधबरा नजरेस पडतो. पावसाळ्यात हा धबधबा लक्ष वेधतो. परंतु पर्यटकांसाठी शासनाने अद्यापही या ठिकाणी सुविधा केल्या नाही.

### पर्यटकांसाठी सोयी-सुविधांचा अभाव हाजराफॉल, ढासगड

## पावसाळ्यात गर्दी; ऐरवी उपेक्षा

**हाजराफॉल धबधब्यावर पोहोचण्यासाठी खडकाळ वाट पार करुन जंगलात जावे लागते. अधिक पाऊस झाल्यास ४० फुटांवरुन धबधबरा ओसंडून वाहून लागतो. नजीकच नागमोडी गुहा असून तो डोंगरावर जाते. परिसराला सौंदर्याची देणगी असली तरी केवळ पासवळ्यातच प्रचंड गर्दी असते. एरवी हा परिस दुर्लक्षित असतो.**

## या सुविधा कधी मिळतील

**पर्यटकांसाठी निवासस्थाने व ये-जा करण्यासाठी सार्वजनिक वाहनांची सुविधा असावी. निवासासोबतच जेवणाची व्यवस्था या स्थळावर नाही. दूर अंतरावरील धाबाचालकांना ऑर्डर द्यावी लागते. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना दर्जेदार सोयीसुविधा मिळाव्यात. या परिसराचा सर्वांगिण विकास केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.**

## वनविभागाची सुरक्षा व्यवस्था

**या ठिकाणी पावसाळ्यात पर्यटकांची होणारी गर्दी लक्षात घेता वनविभाग व वनसमितीचे सदस्य सुरक्षा रक्षकाची भूमिका बजावितात. पर्यटकांना डोहाच्या दिशेने जाण्यास तसेच पाण्यात जाण्यास मनाई करुन परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत मार्गदर्शन करतात.**

# चिल्हाटी-मुरमाडी रस्ता ठरतोय अपघाताला आमंत्रण देणारा

**ककोडी:-** देशाच्या विकासात रस्त्यांची महत्वाची भूमिका असते.त्यामुळेच स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेनचे स्वप्न बघितले जाते.मात्र देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही नागरिकांना रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र देवरी तालुक्यातील आदिवासीबहूल असलेल्या ककोडी परिसरातील गावांचे चित्र आहे.चिल्हाटी,मुरमाडी या दोन गावांना जोडणारा रस्ता म्हणजे अपघाताला निमंत्रणच म्हणायची वेळ आली आहे.नक्षलग्रस्त आदिवासी भागातील चिल्हाटी, मुरमाडी या दोन गावांना जोडणारा तिन किलोमीटरच्या मुख्य मार्गाची पूर्णतः दुरावस्था झाल्याने जागोजागी मोठमोठे खड्डे पडून रस्ता उखडला गेला आहे.

उखडलेल्या रस्त्यावरुन वाहन चालवितांना चांगला रस्ता शोधत प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या दोन्ही गावातील, तसेच तुमडीकसा, कथलिटोला येथील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ककोडीला याच मार्गाने जावे लागते.विद्यार्थ्यांना आपला जिव मुठीत घेऊन या रस्त्याने प्रवास करण्याची वेळ आली आहे. चिल्हाटी आणि मुरमाडी दोन्ही स्वतंत्र ग्राम पंचायतींना जोडणारा रस्ता दुरुस्त करण्याकरीता या भागातील लोकप्रतिनिधींची मात्र उदासिनता दिसून येत आहे.



## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया
## ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा प्रसिद्ध करणे सुचना क्र.२१ (सन २०२२-२३) प्रथम वेळ (खुला प्रवर्ग) खुला प्रवर्ग यांचेकडून ई-निविदा मागविण्याबाबत.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालया अंतर्गत कामांचे पपत्र बी.१ मध्ये दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासना चे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत कंत्राटदार खुला प्रवर्ग यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. प्रसिद्ध कामांची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे. या निविदेमधील कामाबाबत अटी व शर्ती ई. संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिद्ध दिनांक २५/२/२०२३ पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग गोंदिया चे नोटीस बोर्डवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबतचे सर्व शुद्धीपत्रके सुद्धा वरिल संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील.

### ई-निविदा पद्धतीचा तपशिल

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | **दिनांक:-२५/२/२०२३ पासून** |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ (Start) | **दिनांक:- २५/२/२०२३ सकाळी ११.०० वाजेपासून** |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | **दिनांक:-३/३/२०२३ चे सायं.५.०० वाजेपर्यंत** |
| ऑनलाईन निविदा उघडणे. (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता जि.प.सा.बां. विभाग गोंदिया यांचे कक्षात संबंधित निविदा धारकांचे समक्ष **दिनांक:-६/३/२०२३ रोजी दुपारी १.०० वाजेपासून** लिफाफा क्रमांक-१ उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

दिनांक:-२२/२/२०२३

स्वा/- **(अतुल मेश्राम)** कार्यकारी अभियंता जि.प.सा.बा.विभाग, गोंदिया

स्वा/- **(जनार्दन खोटरे)** मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया

स्वा/- **(शितल व्ही.पुंड)** अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

# पुस्तकं माणसाला घडविण्याचे काम करतात-शिवकुमार शर्मा




## गोंदिया ग्रंथोत्सवाचा समारोपीय कार्यक्रम

**गोंदिया :** ग्रंथालय हा समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. ज्याप्रमाणे कुंभार मातीला आकार देऊन मडके तयार करतात, त्याचप्रमाणे थोर-महापुरुषांचे ग्रंथ व विविध प्रकारच्या वाचन साहित्याची पुस्तके माणसाला घडविण्याचे काम करतात, असे मत जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष शिवकुमार शर्मा यांनी व्यक्त केले.

श्री गुरुनानक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया येथे आयोजित दोन दिवसीय गोंदिया ग्रंथोत्सव-२०२२ च्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरुन ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय गोंदिया द्वारे (ता.२३) आयोजित गोंदिया ग्रंथोत्सव-२०२२ च्या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कोषागार अधिकारी चंद्रशेखर आंबोळे, समाजसेविका प्रा.डॉ. सविता बेदरकर, जिल्हा ग्रंथालय संघाचे सचिव डी.डी. रहांगडाले, सहसचिव वाय.डी. चौरागडे, ॲड. श्रावण ऊके, प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अस्मिता मंडपे मंचावर उपस्थित होत्या.

शासनाने ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून अतिशय स्तुत्य उपक्रम सुरु केला असून या माध्यमातून केवळ ग्रंथ विक्रीच नव्हे तर ग्रंथ संस्कृती वाढीला चालना मिळणार आहे. आई-वडिलांनी विद्यार्थ्यांना बालवयापासूनच वाचनाची सवय लावली पाहिजे. विविध प्रकारच्या साहित्य वाचनातून जीवनाला दिशा मिळते व ज्ञानात भर पडते. आज जरी इंटरनेटचे युग असले तरी पुस्तके वाचणाऱ्यांची संख्या कमी झाली नाही. इंटरनेटच्या माध्यमातून सुध्दा साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. असे असले तरी ग्रंथ विकत घेऊन वाचण्याची सवय लावली पाहिजे. यावेळी त्यांनी कवितांच्या माध्यमातून विविध विषयांवर प्रकाश टाकला व उपस्थितांची मने जिंकली.

राज्यात जवळपास १२ हजार ५०० ग्रंथालये आहेत. गोंदिया जिल्ह्यात १९४ ग्रंथालये आहेत. ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या वाचन संस्कृतीमध्ये वाढ व्हावी यादृष्टीने दरवर्षी ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. वाचन संस्कृती जोपासावी व वाचन चळवळ प्रगल्भ करावी हा या मागचा उद्देश आहे. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून परिसंवाद व साहित्यातून ज्ञानात भर पडते. या निमित्ताने वेगवेगळे वाचन साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध होत असतात. वाचन संस्कृती वाढविण्याकरीता व जोपासण्याकरीता सर्वांनी प्रयत्नशील रहावे, असे अस्मिता मंडपे यांनी यावेळी सांगितले.

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या सत्रात ङ्गपरिसंवादफ आयोजित करण्यात आले. परिसंवादाचा विषय होता "सामाजिक प्रबोधन - एक अवलोकन'. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजसेविका प्रा.डॉ.सविता बेदरकर होत्या. या परिसंवादामध्ये मनोहरभाई पटेल महाविद्यालय देवरी प्रा.डॉ.वर्षा गंगणे, जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता गोवर्धन बिसेन व कापसे कनिष्ठ महाविद्यालय तांडा प्रा.प्रकाश मेहर यांनी सहभाग घेतला होता.

ग्रंथ हे गुरु असतात. ग्रंथ दिशादर्शक समाज घडविण्याचे काम करतात. ग्रंथ वाचनातून माणूस घडत असतो. आज युवा पिढीला मोबाईलचा छंद लागलेला आहे. संध्याकाळी एकत्र येऊन चर्चा करणे व संवाद साधणे हे आजच्या काळात हरवलेले आहे. मोबाईलमुळे माणूस जवळ असून दूर असतो. कोरोनाच्या काळात त्यांनी स्वतःचा अनुभव व्यक्त केला. कोरोना काळात कविता लिहायला शिकलो असे गोवर्धन बिसेने यांनी सांगितले.

प्रबोधन म्हणजे मार्गदर्शन करणे. समाजातील प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक घटक मिळून समाज बनतो. आज समाजामध्ये स्त्री ही असुरक्षीत आहे. स्त्री-पुरुष समानता असली पाहिजे. समाजाला शेतकऱ्यांविषयी तळमळ असायला पाहिजे. प्रत्येकाने समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करावी. ग्रंथालय हे सामाजिक कार्य चळवळीचे एक प्रतिष्ठान आहे. आजच्या नविन पिढीने ग्रंथ व विविध प्रकारच्या वाचन साहित्याची पुस्तके वाचावी, त्यामुळे ज्ञानात भर पडते व आपले विचार प्रगल्भ होत असतात. असे प्रा.डॉ. वर्षा गंगणे यांनी सांगितले.

## ग्रामपंचायत कार्यालय तुकूमनारायण
## पंचायत समिती, अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद गोंदिया
## निविदा सुचना

**ग्रामपंचायत कार्यालय तुकूमनारायण, पंचायत समिती अर्जुनी/मोर., जिल्हा परिषद गोंदिया येथे ग्रामपंचायतस्तर १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत जिल्हा परिषद स्तर १० टक्के निधी अंतर्गत खालील खालील प्रमाणे कामाकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून(दोन) लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | नियोजन वर्ष | निविदा फार्म किंमत | अनामत रक्कम १% | बिलातून कपात करण्यात येणारी रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.शंकर शेंडे ते तुषार बनपुरकर यांच्या घरापर्यत सिमेंट रस्ता बांधकाम १५० मिटर | 300000/- | 2021-22 | 500/- | 3000/- | शासकीय नियमानुसार | 3 महिने | योग्य त्या वर्गवारीचा |

सदर कामे करण्याकरीता दोन लिफापा पध्दतीने अनुसुची ब-०१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे.तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे विक्रीकरीता उपलब्ध आहेत.नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी.निविदा ०८/०३/२०२३ रोजी दुपारी १२ वाजता (शक्य झाल्यास)निविदा धारकाच्या समक्ष उघडण्यात येईल.काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

**निविदेचा वेळापत्रक**

| | |
|---|---|
| १ निविदा प्रसिध्दी | दिनांक ०१/०३/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| २)निविदा ऑफलाईन भरणा दिनांक | दिनाक ०१/०३/२०२३ सकाळी ११.०० वा ते.०७/०३/२०२३ सांय.०५.०० वाजता |
| ३)निविदा पपत्र व फि/बयाना रक्कम निविदा दस्तावेज व कागदपत्रे कार्यालयात जमा करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनाक ०१/०३/२०२३ सकाळी ११.०० वा ते.०७/०३/२०२३ सांय.०५.०० वाजता |
| ४)ऑफलाईन निविदा उघडणे | सरपंच सचिव ग्रा.प.तुकूमनारायण यांचे कक्षात संबंधित निविदाधारकाच्या समक्ष दिनांक.०८/०३/२०२३ दुपारी १२ वाजता |
| ५)निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे | -ग्राप कार्या.तुकूमनारायण खाते क्र.९७७९०१०००१४४२७ बॅंकेचे नाव बॅंक ऑफ बडोदा शाखा अर्जुनी मोर, IFSC Code_- BARBBODBARJN या खात्यावर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रा.प.तुकूमनारायण येथे रोखीने भरणा करावे. |

**नरेंद्र सदाशिव लोथे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत तुकूमनारायण**

**टि.आर.जनबंधू**
**ग्राम विकास अधिकारी**
**ग्रामपंचायत तुकूमनारायण**

# आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसह पाच तस्कर अटकेत



**देवरी:-**गोंदिया -जिल्ह्यात वन्यप्राण्याच्या अवयवांची तस्करी व विक्री होणार असल्याची गुप्त माहिती विशेष व्याघ्र संरक्षण दल व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार वनाधिकाऱ्यांनी पोलिसांसह रविवार, २६ फेब्रुवारीला संयुक्त कारवाई करीत मंगेझरी आणि पालांदूर येथे छापा टाकून विविध वन्यप्राण्यांचे अवयव जप्त केले. आरोपींकडून देशी दारूच्या २२ पेट्या आणि रोख रक्कमही हस्तगत करण्यात आली.याप्रकरणी शामलाल विक मडावी (रा. मांगेझरी देवरी), दिवास कोल्हारे (रा. मांगेझरी), माणिक दरसू ताराम (रा. मांगेझरी), अशोक गोटे (रा. मांगेझरी) व रवींद्र लक्ष्मण बोडगेवार (रा. पो. पालांदूर, ता. देवरी, जी. गोंदिया) या आरोपींना अटक करण्यात आली आहे. यातील आरोपी माणिक दरसू ताराम हा आत्मसमर्पित नक्षलवादी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

आरोपींकडून वाघ किंवा बिबट या मांजर कुळातील वन्यप्राण्यांचे २ दात, १ नख, अस्वलाची ३ नखे, १० रानडुक्कर सुळे, चितळाचे १ शिंग, सायाळ प्राण्याचे काटा, खवल्या मांजराचे खवले, ताराचे फासे, १ जिवंत मोर, ५ बंडल मोरपिसे, रानगव्याचे १ शिंग, जाळे, सुकलेली हाडे, रक्त पापडी (झाडाची साल), सुकवलेले मास, २२ पेटी देशी दारु (अंदाजे किंमत ८४,००० रु.) आणि रोख २१,४९,४४० रुपये हस्तगत करण्यात आले. पाचही आरोपींविरोधात वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ च्या विहित कलमान्वये वनगुन्हा नोंदविण्यात आला.सखोल तपासात आरोपींनी दुर्मिळ काळा बिबटची शिकार केल्याचेही समोर आले व त्याबाबतचे पुरावे हस्तगत करण्यात आले. दरम्यान, आरोपींकडून जप्त करण्यात आलेली रोख रक्कम दारू विक्रीतील नसून वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या व्यवहारातून मिळाली असावी, असा संशय पोलिसांना आहे. त्या दिशेने आमचा तपास सुरू आहे.

# लिलावात मिळालेल्या गाळ्यांची विक्री

## पालिकेच्या दुर्लक्षाने २८ वर्षांपासून रखडला लिलाव: अत्यल्प भाड्यात मिळणार लाभ

**गोंदिया:** नगर परिषदेच्या या दुकानांचे लिलाव २८ वर्षापेक्षा अधिक काळापासून झाले नाही. जर आता लिलाव झाले तर अनेक बाबी उघडकीस येतील. वास्तवात यापैकी अनेक दुकाने, ज्यांना लिलावात दुकाने मिळाली होती. त्यांनी दुसऱ्यांना विक्री केले आहे. नगर परिषदेचे भाडे आजही खूप कमी आहे. मात्र व्यापारी दृष्टीकोनातून दुकानदारांनी दुकानांची विक्री केली आहे. त्यातून मोठी रक्कम या दुकानदारांना मिळाली असून नगर परिषदेचे हात खालीच राहिले.




नगर पालिकेने आपल्या जागेवर ठिकठिकाणी दुकान गाळ्यांचे बांधकाम केले. त्या दुकानगाळ्यांच्या लिलाव करण्यात आला. अत्यंत कमी पैशांत दुकाने भाड्याने देण्यात आली. शहरात १०७८ दुकाने गाळे असून ते दुकानगाळे ३ वर्षाकरिता भाड्याने देण्यात आले होते.

नवीनीकरणानंतर सहा वर्षांपर्यंत दुकान चालविण्याचे अधिकार देण्यात आले होते. त्यानंतर पालिका त्या दुकानांचा फेरलिलाव करुन भाडेवाढ करणार होती.

मात्र आजघडीला २८ वर्षांचा काळ लोटला असताना देखील पालिका प्रशासनाला त्या दुकानांच्या फेरलिलावाचा आणि भाडेवाढीचा विसर पडला आहे. कायद्यानुसार ९ वर्षानंतर कोणत्याही स्थितीत दुकानांचा लिलाव करणे आवश्यक आहे. अनेकांची दुकाने भाड्याने घेऊन त्यांची विक्री देखील केली आहे. कमी भाडे भरुन लाखो रुपयांचा व्यवसाय सुरु आहे. असे असताना देखील त्या दुकानांचे भाडे देखील नियमित भरत नसल्याची माहिती समोर आली आहे.

### कुठे आहेत, किती दुकाने

**नगर परिषदेचे १५६ दुकाने गंज बाजारात आहेत. लोहा लाईन १५, न्यू लोहा लाईन १५, न्यू कपडा लाईन ६५, जुन्या टॅक्स विभागाच्या खाली १५, टाऊन स्कूल ३२, जयस्तंभ चौक १४, पाणी टाकीसमोर १३, न्हावी लाईन २१, सब्जी बाजार ८८, लोहा शेडा २०, जाली शेड प्रथम माळा २६, जाली शेड तळमाळा ३३, जुने बस स्थानक २१, मनोहर मार्केट ६१, स्टेडियम ५९, रामनगर शॉपिंग कॉम्पलेक्स ४२ व इतर ठिकाणी दुकाने आहेत.**

### राजकीय लाभासाठी महसुलावर पाणी

**गेल्या अनेक वर्षापासून पालिकेच्या मालकीच्या शहरातील दुकान गाळ्यांचे फेरलिलावर झाले नाही. त्यामुळे ज्या दुकानदारांनी दुकाने भाड्याने घेतली होती. त्यांनी आता कब्जा केल्याचे दिसून येत आहे. अनेक दुकानदारांनी त्या दुकानांच्या आकारात बदल केले असून बांधकाम केले. हे नियमबाह्य आहे. अनेकदा दुकान गाळ्यांच्या लिला-वाची मागणी झाली, मात्र तो विषय बाजूला सारण्यात आला.**

# रानगवे करताहेत धान पीक फस्त

## वन विभागाचे दुर्लक्ष शेतकऱ्यांच्या उपोषनाचा इशारा



**अर्जुनी-मोरगाव:** शेतकऱ्यांनी नुकतेच उन्हाळी धानची ला-गवड केली. धान डूलत असताना अचानक रानगव्याने शेतच फस्त करण्याचा उपक्रम मागील आठ दिवसापासून सुरूईटखेडा जवळील डोंगरगाव रीठी येथे चालविला आहे. वन विभागाकडे तक्रार करून सुद्धा साधी चौकशी सुद्धा केली नाही त्यामुळे शेतकऱ्यात तीव्र असंतोष पसरला असून वनपरिक्षेत्र कार्यालय अर्जुनी मोरगाव समोर उपोषणाचा इशारा दिला आहे.

अर्जुनी मोरगाव वनपरिक्षेत्रांतर्गत इटखेडा गावातील शेतकऱ्यांची डोंगरगाव रिठी येथे शेती आहे .उन्हाळी धान पिकाची लागवड होऊन पंधरा दिवस झाले. शेतामध्ये चांगल्या प्रकारे धान डोलत आहेत. शेतकऱ्यांनी स्वत:चे सर्वस्व अर्पण करून धाण पिकाची लागवड केली. अशातच मागील चार दिवसापासून जंगल परिसर लगतच्या धान पिकावर रान गव्याच्या कळपाने शेतपीक फस्त करण्याचा उपक्रम चाल-वला. संबंधित घटनेची माहिती सरपंच आशाताई झिलपे यांनी वनपरिक्षेत्राधिकारी अर्जुनी मोरगाव यांना दिली. वनपरिक्षेत्राचे कर्मचारी यांनी फक्त रात्री आम्ही ग्रस्त घालतो असे सांगितले .परंतु मोका चौकशी अद्यापही झाली नाही मध्यंतरीच्या दोन दिवसांच्या कालावधीनंतर पुन्हा रानगव्याणे धुमाकूळ घातला. रात्रीची गस्त असताना गवे पुन्हा आक्रमक झाल्याने यांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी हैराण झाले असून वनाधिकारी आता लक्ष देत नसल्याचे गाऱ्हाणे कुणासमोर मांडायचे हा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा ठाकला आहे. गावात व लगतच्या जंगलात वाघ,अस्वल सारख्या जंगली जनावरांचे नेहमीच वावर असल्याने शेतकरी सुद्धा घाबरल्याने सायंकाळ झाली की घरी परत येतात, रात्री शेतामध्ये गस्त घालायला घाबरत आहेत.

इटखेडा येथील त्रस्त शेतकऱ्यांनी वन अधिकाऱ्यांनी रानगव्याचा बंदोबस्त न केल्यास शेवटी पर्याय म्हणून वनपरिक्षेत्र कार्यालय अर्जुनी मोरगाव येथे समोर उपोषणाच्या इशारा उद्धव मेहंदडे, विकास लांडगे, आनंदराव मेहंदळे, गोवर्धन मिसाळ, मोरेश्वर मिसाळ, सेवक प्रधान, हरिदास प्रधान, मोरेश्वर प्रधान, जगन लांडगे, सिद्धार्थ गडपाल, टिकाराम बोरकर, रवी बोलने, मनोहर लांजेवार, मारुती प्रधान, रमेश ठाकरे, रूपराम धांडे व इतरांनी दिला असून यासंबंधीचे निवेदन खासदार प्रफुलभाई पटेल, आमदार मनोहर चंद्रीकापुरे, उपवन संरक्षक गोंदिया यांना पाठविले आहे.

# सालेकसा नगरपंचायतमध्ये ना मुख्याधिकारी, ना पदाधिकारी, कारभार वाऱ्यावर

**सालेकसा :** येथील नगरपंचायतमध्ये एकीकडे मागील दोन वर्षांपासून नियमित मुख्याधिकारी नाही. त्यात नगराध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांचा १२ जानेवारी रोजी पहिला कार्यकाळ संपला आहे. कार्यकाळ संपण्याआधी निवडणुक न झाल्यामुळे आता नगरपंचायत कामकाज वाऱ्यावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी आपली व्यथा कोणाकडे मांडावी, असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

२०१५ मध्ये सालेकसा ग्रामपंचायतला नगरपंचायत घोषित करण्यात आले. परंतु नगरपंचायतचा परिसर शहराबाहेर असून सालेकसा मुख्यालया सह सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालये व मुख्य बाजारपेठ आमगाव खुर्द ग्रामपंचायतच्या हद्दीत असल्याने आमगाव खुर्दला ही नगरपंचायतमध्ये समाविष्ट करण्याची मागणी झाली. हे प्रकरण शासन दरबारी व न्यायालयापर्यंत पोहोचले.

दरम्यान, प्रकरण निकाली लागण्याआधीच नगरपंचायतची २०१७ मध्ये पहिली निवडणूक झाली. लोकशाही पद्धतीने नगरपंचायतवर सत्ता स्थापन करण्यात आली. परंतु आमगाव खुर्दला समाविष्ट करण्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात आले. शेवटी शासनाने आमगाव खुर्द




नगरपंचायतमध्ये समाविष्ट केले, परंतु प्रतिनिधित्व देण्यात आले नाही. नव्याने निवडणुका घेऊन संयुक्त नगरपंचायतची सत्ता स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. ती सुद्धा शासनाने पूर्ण केली नाही. त्यामुळे नगरपंचायतमध्ये निवडून आलेले नगराध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांना आमगाव खुर्दची जबाबदारी सुद्धा देण्यात आली. परंतु आमगाव खुर्दकडे हवे तेवढे लक्ष दिले जात नाही, अशी तक्रार आमगाव खुर्दवासी सतत करीत राहिले.

दरम्यान, नगरपंचायतमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वाद निर्माण होत असल्याने मुख्याधिकारी नियमितपणे टिकून राहिले नाही. याचा परिणाम विकास कामावर होत राहिला. मुख्याधिकाऱ्यां अभावी कारभार कधी दुसऱ्या तालुक्यातील मुख्याधिकाऱ्यांकडे देण्यात आला तर कधी तहसीलदारांकडे अतिरिक्त कारभार देण्यात आला. यामुळे नगरपंचायतचा हवा तसा विकास होऊ शकला नाही. निवडणुका न झाल्याने प्रशासकराज आले आहे. परंतु मागील दोन वर्षांपासून नियमित मुख्याधिकारी सुद्धा नाहीत. मागील दीड महिन्यापासून कौटुंबिक कारणामुळे सुटीवर असल्यामुळे तहसीलदारांचा प्रभार नायब तहसीलदारांकडे देण्यात आला आहे. अशात नगरपंचायतकडे सपशेल दुर्लक्ष होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. प्रशासनाने येथील नगरपंचायतला वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येत आहे. तर दोन-तीन नियमित कर्मचारी आणि काही कंत्राटी कर्मचारी कामकाज पाहत असून जनता किंवा शहरातील समस्यांकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे.

# अंगणवाडी सेविकांचा संप अद्यापही सुरूच

**गोंदिया:-** महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कृती समितीच्या वतीने अंगणवाडी सेविका यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी राज्यभरात सोमवारपासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपाचा आज पाचवा दिवस असून, यावर अद्यापही तोडगा निघालेला नाही. मात्र या संपाचा फटका लाखो बालकांना बसत आहे. कारण अंगणवाडी बंद असल्याने सहा वर्षापर्यंतची बालके पोषण आहारापासून वंचित राहत आहेत. वेतनश्रेणी लागू करणे किंवा मानधनात वाढ करणे, पेन्शन लागू करणे आदी प्रमुख मागण्यांसाठी २० फेब्रुवारीपासून महाराष्ट्रात अंगणवाडी कर्मचारी संघटनांच्या कृती समितीने




अंगणवाडी सेविका-मदतनिस यांनी बेमुदत राज्यव्यापी संप पुकारलेला आहे. दरम्यान, या काळात राज्यातील अंगणवाड्या बंद करुन सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस संपात सहभागी झाल्या आहेत. गोंदिया जिल्ह्यात आयटक नेते हौसलाल रहांगडाले यांच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरु आहे.

माहितीनुसार, अमरावतीमध्ये अंगणवाडी सेविका संपावर निघाल्या आहेत आणि यामुळे या जिल्ह्यातील १ लाखाच्यावर चिमुकले पोषक आहारापासून वंचित आहेत. तसेच, अमरावती जिल्ह्यातील १८३३ अंगणवाडी सेविका व १४११ मदतीनस संपावर गेल्या आहेत. त्यामुळे १६६५ अंगणवाडी केंद्र सध्या बंद आहेत.

दरम्यान, आयटकच्यावतीने सोमवारपासूनच जिल्ह्यातील सर्व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयासमोर निदर्शने करुन शासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. देवरी येथे आमदार सहसराम कोरेटे, सडक अर्जुनी येथे आमदार मनोहर चंद्रिकापूरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर आदींनी या आंदोलनात सहभागी होत आपला पाठिंबा दर्शविला. तसेच शासनाकडे मागण्यांकरीता पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. संपात देवांगना अबुंले गोरेगांव, पुष्पा ठाकुर, अंजना ठाकरे सडक अर्जुनी, पोणीमा चुटे आम्रकला डोंगरे, संगिता जनबंधु देवरी, कांचन शहारे, अनिता शिवनकर, पंचशिला शहारे आमगांव, पुष्पा भगत, मिनाक्षी राऊत, सुनिता मेश्राम, तिरोडा जिवनकला वैद्य, बिरजूला तिडके, दुर्गा संतापे, मिनाक्षी पटले, किरण ठवरे सालेकसा, ज्योति लिल्हारे, सुनिता मंलगाम, छाया उके, सुनिता मडावी, लता बरेकर आदिंचा समावेश होता.

# आमदार विनोद अग्रवाल यांच्या माध्यमातून रक्तदात्यांना मोबाईल व्हॅन उपलब्ध




**गोंदिया:-** गेल्या अनेक दिवसांपासून गोंदिया रक्तपेढीला शिबिरासाठी मोबाईल व्हॅन उपलब्ध न झाल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. परंतु ही समस्या आमदार विनोद अग्रवाल यांच्या निदर्शनास येताच त्यांनी गंगाबाई रक्तपेढी सार्वजनिक समस्या सोडवण्यासाठी त्यास प्राधान्य दिले. तसेच थॅलेसेमिया, प्लॅस्टिक ॲनिमिया, हिमोफिलिया, डायलिसिस, कॅन्सर अशा अनेक प्रकारच्या गंभीर आजारांसाठी गर्भवती महिलांना आणि वेगवेगळ्या प्रकारच्या रुग्णांना नेहमी रक्ताची गरज भासते, त्यांना वेळेवर रक्त न मिळाल्यास अनेकांचा मृत्यू होतो. अशा परिस्थितीत जनतेने सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करत या शिबिरात सक्रिय सहभागी व्हावे.

रक्तदान शिबिरांमध्ये ही मोबाईल व्हॅन अतिशय फायदेशीर ठरणार आहे. लोकहिताच्या समस्यांना प्राधान्य देऊन आमदार विनोद अग्रवाल यांनी नेहमीच आरोग्याला प्राधान्य दिले असून त्यांच्या माध्यमातून हजारो लोकांचे मोफत उपचार करणे, अनेक गरजूंना आर्थिक मदत करणे असे काम ते गेली अनेक वर्षापासून करत आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी ३४ दिव्यांग बांधवांना मोटार चालवलेल्या ट्रायसायकलचे मोफत वाटप केले. यासोबतच काही दिवसात ज्यांना ऐकू येत नाही त्यांना श्रवणयंत्रही उपलब्ध करून दिले जाणार असून त्यासाठी नोंदणी मोहीमही सुरू करण्यात आली आहे. अशी अनेक स्तुत्य कामे आमदार विनोद अग्रवाल यांच्याकडून जनहितार्थ सुरू आहेत.

# आमगाव तहसील कार्यालयाच्या शिपायाच्या आत्महत्येचा प्रयत्न

**गोंदिया:-** आमगाव येथील येथील तहसील कार्यालयात कार्यरत एका शिपायाने तहसील कार्यालय परिसरातील पिंपळाच्या झाडावर चढून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना आज २७ फेब्रुवारीला दुपारी घडली.राकेश बोरकर असे शिपायाचे नाव आहे. या प्रकाराने तहसील कार्यालय प्रशासनात एकच खळबळ उडाली होती.



येथील तहसील कार्यालयात मागील ऑगस्ट महिन्यांपासून राकेश शिपाई पदावर कार्यरत आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मागील सहा महिन्यांपासून राकेशचे वेतन झालेले नाही. सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने राकेश आर्थिक सकंटात सापडला. यातच त्याच्यावर झालेली उधारी मागणाऱ्यांचा सतत तगादा, उधारीची रक्कम वाढल्याने कोणीही उधार देण्यास तयार नसल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न राकेश समोर निर्माण झाला. आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा या विवंचनेत राकेश होता. परिणामी आर्थिक विवंचनेत राकेशने तहसील कार्यालय परिसरातील पिंपळाच्या झाडावर चढून आत्महत्येचा प्रयत्न करीत असल्याचे सांगितल्याने तहसील कार्यालयातील अधिकारी, कमचारी आणि विविध कामानिमित्त आलेल्या नागरिकांनी त्याची समजूत काढत झाडावरुन खाली उतरविले.

# न्यायाधिशांच्या अहवालावरुन तीन महिला पोलीस निलंबित

**गोंदिया :** येथील जिल्हा सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाजासाठी लावण्यात आलेल्या तीन महिला पोलीस शिपाई यांच्या कामकाजा व गैरहजेरी संदर्भात न्यायाधीशांनी पाठविलेल्या अहवालावरुन पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांनी तीन महिला पोलिसांना २४ फेब्रुवारी रोजी निलबिंत केले आहे. निलंबित झालेल्या महिला पोलिस कर्मचाऱ्यांत रामनगर पोलीस ठाण्यातील शिल्पा जांगळे, भरोसा सेलमध्ये कार्यरत अश्वीनी फंदी व डुग्गीपार पोलीस ठाण्यातील अनिता हरिणखेडे यांचा समावेश आहे. त्या जिल्हा सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाजासाठी असतांना त्यांनी आपल्या कामात हलगर्जीपणा करीत गैरहजर राहिल्याचा ठपका ठेवत न्यायाधीशांनी त्यांचा अहवाल पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांना पाठविला.या अहवालाच्या आधारे त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

# मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने भाषा संवर्धनाचा संकल्प करु या

**गोंदिया :** मराठी ही समृद्ध भाषा असून मराठी भाषेची साहित्य संपदा विपुल प्रमाणात आहे. दैनंदिन व्यवहारात आपण आपल्या मातृभाषेचा वापर तर करावाच त्याचबरोबर मराठी साहित्य मोठ्या प्रमाणात वाचावे. भाषा व साहित्य माणसाला ज्ञानी व प्रगल्भ करत असते. मराठी भाषेचा अभिमान बाळगण्याचा आजचा दिवस असून आजच्या मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने भाषा संवर्धनाचा संकल्प करुया असे प्रतिपादन जिल्हा सांख्यिकी अधिकारी रुपेशकुमार राऊत यांनी केले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने शासकीय ग्रंथालय येथे आज कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अस्मिता मंडपे, माहिती सहायक के. के. गजभिये व जिल्हा ग्रंथालय कार्यालयाचे अंकुश कटरे यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

मराठी ही आपली मातृभाषा आहे. मराठी भाषेचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. आपल्या शैलीदार लेखनीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त निदोष बोलणे, लिखाण दर्जेदार होण्यासाठी प्रयत्न करणे. सतत वाचन करणे आवश्यक आहे. असे जर प्रत्येक मराठी व्यक्तीने प्रयत्न केले तर मराठी भाषेचे निश्चितच संरक्षण आणि संवर्धन होऊ शकेल असे श्री. राऊत यांनी यावेळी सांगितले.

"येथल्या दरीदरीत हिंडते मराठी, येथल्या वनावनात गुंजते मराठी, येथल्या तरुलतात साजते मराठी, येथल्या कळीकळीत लाजते मराठी, येथल्या नभामधून वर्षते मराठी, येथल्या पिकांमधून डोलते मराठी, येथल्या नद्यांमधून वाहते मराठी, येथल्या चराचरात राहते मराठी" या कवी सुरेश भट यांच्या कवितेच्या ओळी मराठी भाषेचा यथार्थ गौरव करणाऱ्या आहेत, असे जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते यांनी सांगितले. संत ज्ञानेश्वर माऊलींनी जैसी दीपांमाझि दिवटी। कां तिर्थीमाझि पूर्णिमा गोमटी। तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी । सर्वोत्तम।। जैसी सरितांमध्ये गोद-ावरी। कां पर्वतांमधे रत्नगिरी। तैसी भाषांमध्ये साजरी। मऱ्हाटी पै।। अशा शब्दांत मराठी भाषेचा महिमा सांगितला आहे. त्यांनी मराठी भाषेला कस्तुरीची उपमा दिली, असे त्यांनी यावेळी सांगितले. आजच्या मराठी भाषा गौरव दिनी आठवड्याला एक मराठी पुस्तक



वाचण्याचा संकल्प करुया असे आवाहन त्यांनी केले.

मराठी भाषा गौरव दिन २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. मराठी भाषा गौरव दिन महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्म दिवसानिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी राजभाषा दिनाला मराठी गौरव दिन असेही म्हटलं जातं. आपल्या पुढील पिढीने मराठी भाषेचे संवर्धन करावे म्हणून मराठी गौरव भाषा दिन साजरा केला जातो.

मराठी ही सर्वांगसुंदर भाषा असून भारतातील अधिकृत २२ भाषांपैकी एक भाषा आहे. मराठी भाषा जगातील लोकसंख्येत सर्वाधिक बोलली जाणारी १५ वी भाषा आहे तर भारतात सर्वात जास्त बोलली जाणारी तिसरी भाषा आहे. महाराष्ट्र तसेच गोवा या दोन राज्यांची मराठी ही अधिकृत राज भाषा आहे. मराठी भाषेची साहित्यसंपदा विपुल असून या भाषेला थोर परंपरा लाभली आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अस्मिता मंडपे यांनी केले.

# १५ हजारांच्या प्रोत्साहन राशीचा जीआर निघाला

**गोंदिया:-** धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमतीशिवाय राज्य शासनाने दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टर १५ हजारांची प्रोत्साहनपर राशी देण्याची घोषणा हिवाळी अधिवेशनात केली होती. अखेरीस याबाबतचा शासननिर्णय २४ फेब्रुवारी रोजी काढण्यात आला असून धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तथापि, आता सदर राशी तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कारवाई करावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.



जिल्ह्यात शेतकऱ्यांची संख्या २ लाख ७२ हजार आहे. पैकी जिल्हा पणन कार्यालयाकडे १ लाख १५ हजार ८३६ व आदिवासी विकास महामंडळाकडे ३५ हजार ३५८ शेतकऱ्यांनी धान विक्रीकरिता नोंदणी केली होती. या सर्व शेतकऱ्यांनाच बोनस रक्कम दिली जाणार आहे. उर्वरित शेतकऱ्यांना प्रोत्साहन राशीला मुकावे लागेल

केंद्र सरकारच्या आधारभूत भावाव्यतिरिक्त राज्य सरकारकडून बोनसच्या स्वरुपात शेतकऱ्यांना अर्थसहाय्य केले जात होते. यापूर्वी साधारणत: २०० रुपयांपासून सुरू झालेले बोनस ७०० रुपयांपर्यंत येऊन थांबले. परंतु, राज्य शासनाने बोनसची परंपरा खंडीत करून डिबीटीच्या माध्यमातून मदत करण्याची नवी योजना जाहीर केली होती. तेव्हापासून बोनस किंवा प्रोत्साहन राशीपासून शेतकरी वंचित होते. दरम्यान, हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी धानाला प्रती हेक्टरी १५ हजार रुपयांचा बोनस जाहीर केला. त्यानंतर या निर्णयाला मंत्रिमंडळात मंजुरी देण्यात आली. आणि अखेरीस २४ फेब्रुवारी रोजी याबाबतचा शासन आदेश काढण्यात आलेला आहे.

ज्या शेतकऱ्यांची नोंदणी आधारभूत केंद्रांवर नसेल त्यांनाही प्रोत्साहनपर राशी दिली जाणार आहे. प्रोत्साहनपर राशीस पात्र होण्यासाठी शेतकऱ्यांनी त्यांचे धान अभिकर्ता संस्थांना विक्री करणे बंधनकारक नाही. शेतकऱ्याने सादर केलेला सातबाराचा उतारा त्यावरील धान लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्रफळानुसार प्रोत्साहनपर राशीची रक्कम निश्चित केली जाणार आहे. यासाठी महसूल विभागाने विकसित केलेल्या ई-पीक पाहणी ॲपद्वारे संकलित केलेल्या माहितीचा आधार घेतला जाणार आहे.